


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २५.०७.२०२६ | अंक नं. ०९९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# एकाच दिवशी तीन गाड्यांच्या काचा फोडून रोकडसह दागिन्यांची चोरी

## दिल्लीगेट व इम्पिरियल चौक परिसरातील घटना

नगर – शहर आणि परिसरात चोरट्यांचा उपद्रव वाढला असून दिल्लीगेट आणि इम्पिरियल चौक परिसरात उभ्या असलेल्या तीन चारचाकी वाहनांच्या काचा फोडून अज्ञात चोरट्याने रोकड व दागिन्यांसह महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

याबाबत रामेश्वर श्रीकिसन शर्मा (वय ४०, रा. शारदानगर, कर्जत) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी आपली चारचाकी गाडी मनोवेध सेंटरजवळ पार्क केली होती. २४ जुलै रोजी दुपारी १२.५० ते १.४५ या वेळेत अज्ञात चोरट्याने गाडीच्या डाव्या बाजूच्या मागील खिडकीची काच फोडली. गाडीत ठेवलेली ३ हजार रुपयांची रोख रक्कम आणि २४ हजार रुपये किम्मतीच्या ८ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दोन रिंग असा एकूण २७ हजार रुपयांचा ऐवज चोरट्याने पळवला.

त्याच सुमारास जवळच उभ्या असलेल्या प्रकाश विठ्ठल वाळके यांच्या गाडीची मागील काच फोडून चोरट्याने महत्त्वाची बॅग चोरून नेली. या बॅगेत बॅंकेचे चेकबुक, ओळखपत्रे, वाहन परवाना तसेच बांधकामाशी संबंधित महत्त्वाची बिले व कागदपत्रे होती. या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

फिर्यादी रामेश्वर शर्मा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५ (थ) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

तिसऱ्या घटनेत बुरुडगाव रोडवर असलेल्या फेमस पुरी भाजी हॉटेल, इम्पिरियल चौक येथे पार्क केलेल्या कारची मागील काच फोडून अज्ञात चार चोरट्यांनी ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना २४ जुलै रोजी दुपारी २.१५ वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत रोहीदास इंद्रमान झावरे (वय ३२, रा. केडगाव) हे २४ जुलै रोजी दुपारी आपल्या ऑरा कारने (क्र.एमएच १७ सीएस ०६७४) इम्पिरियल चौक परिसरातील फेमस पुरी भाजी हॉटेलजवळ आले होते. त्यांनी आपली कार तेथे पार्क केली होती. दरम्यान, दुपारी २.१५ वाजेच्या सुमारास चार अज्ञात आरोपींनी कारची मागील काच फोडली आणि कारमध्ये ठेवलेल्या फिर्यादी व त्यांच्या साक्षीदारांच्या बॅगा चोरून नेल्या. या बॅगांमध्ये रोख रक्कम, डेल कंपनीचा लॅपटॉप, महत्त्वाचे कागदपत्रे, आधार कार्ड आणि पॅन कार्ड असा एकूण ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल होता.

रोहीदास झावरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे चार अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**300 स्के.फू. रोडटच दुकान भाड्याने देणे**

नवीपेठ मध्ये, नवीन मराठी शाळे समोर, रोडटच दुकान भाडयाने देणे

7350012310
8888965980






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ...अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

## कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठे यश

नवी दिल्ली - कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनला सर्वात मोठे यश मिळाले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. नीट पेपर फुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारुन प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सीजेपीने लावून धरली होती. यासाठी महिन्याभरापासून सीजेपीचे आंदोलन सुरु होते. अखेर प्रधान यांनी राजीनामा दिला आहे.

नीट पेपर फुटी प्रकरणी सीजेपीसह काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. सीजेपीच्या प्रवक्त्यांनी सरकार सोबत झालेल्या दोन बैठकांमध्ये राजीनाम्याचा विषय लावून धरला. पण सरकार याबद्दल फारसे अनुकूल नव्हते. तर दुसऱ्या बाजूला प्रधान यांची राजीनाम्याबद्दल कोणतीही तडजोड होणार नाही, अशी ठाम भूमिका सीजेपीने घेतली होती. यानंतर अखेर प्रधान यांनी राजीनामा दिला.



सीजेपीच्या शिष्टमंडळाशी आज तिसऱ्या टप्प्यातील चर्चा सरकार करणार होते. दुपारी साडे तीनच्या सुमारास बैठकीची वेळ ठरली होती. ही बैठक होण्यापूर्वीच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलेला आहे. प्रधान यांनी त्यांचा राजीनामा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केलेला आहे. पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात काम करण्याची संधी दिल्याबद्दल प्रधान यांनी त्यांचे आभार मानले.

सोशल मीडियावर राजीनाम्याची घोषणा करताना प्रधान यांनी मंत्रिपदावरुन पायउतार होण्यामागील कारणदेखील सांगितले आहे. '२० लाखांहून अधिक विद्यार्थी नीटची परीक्षा देतात. ती परीक्षा निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने होण्यास प्राधान्य दिले. त्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा प्रशासन, विद्यार्थी आणि पालकांच्या साथीने २१ जून २०२६ रोजी पुन्हा यशस्वीरित्या परिक्षेचे आयोजन केले. १६ जुलैला या परिक्षेचा निकाल लागला. त्यात अनेक गरीब आणि वंचित कुटुंबांमधील प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांना यश मिळाले. पण काही जबाबदार पदांवर बसलेल्यांनी विद्यार्थ्यांची दिशाभूल केली. त्यामुळे मला दुःख झाले,' असे प्रधान यांनी एक्स पोस्टमध्ये नमूद केले आहे. नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पासून सत्तेत आहेत. केंद्रात त्यांच्या सरकारची तिसरी टर्म सुरु आहे. मोदी गेल्या १२ वर्षांपासून पंतप्रधान पदावर आहेत. या कालावधीत केवळ ७ नेते मोदींसोबत त्यांच्या मंत्रिमंडळात राहिले आहेत या ७ नेत्यांमध्ये प्रधान यांचा समावेश होता. गेल्या १२ वर्षांपासून प्रधान नॉट आऊट होते. अखेर नीट पेपर फुटी प्रकरणात त्यांची विकेट गेलेली आहे.




दिल्लीतील आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ खा. निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली २५ जुलै रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेवून धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सहभागी झालेले महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी.

# एमआयडीसी परिसरात भरदिवसा घर फोडून चोरी

नगर - एमआयडीसी परिसरातील साईराजनगर येथे दिवसाढवळ्या घरफोडीची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कमेसह एकूण ५४ हजार रुपयांचा ऐवज लांबवला आहे.

याबाबत सुनील गवाजी शिंदे (वय ३४, साईराजनगर, एमआयडीसी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १४ जुलै रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास कामानिमित्त घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास ते परत आले असता, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे निदर्शनास आले.

घरात प्रवेश करून चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला. याप्रकरणी सुनील शिंदे यांच्या फिर्यादीवरून २४ जुलै रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (१) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# निर्णय आपले... प्रभाव कोणाचा?

आपण निर्णय घेतो... की निर्णय आपल्याला घेतात?



राजन कुटे

आर्थिक निर्णय घेताना आपण अनेकदा असे मानतो की आपण पूर्ण विचार करून, स्वतःच्या इच्छेने निर्णय घेत आहोत. परंतु शांतपणे मागे वळून पाहिले, तर अनेक निर्णयांच्या मागे आपल्या विचारांपेक्षा इतर अनेक अदृश्य प्रभाव कार्यरत असतात.

कधी नातेसंबंध, कधी सामाजिक अपेक्षा, कधी एखाद्या समूहाचा प्रभाव, कधी व्यवसायातील ओळख, आणि कधी फक्त सगळेच करत आहेत ही भावना.

आपण स्वतःला एक साधा प्रश्न विचारूया. आपली प्रकृती बिघडली, तर आपण डॉक्टर निवडताना फक्त तो आपला नातेवाईक आहे म्हणून त्याच्याकडे जातो का?

घर बांधायचे असेल, तर केवळ ओळखीचा आहे म्हणून एखाद्याकडे नकाशा तयार करण्याची जबाबदारी देतो का? बहुतेक वेळा उत्तर नाही असेल. कारण अशा वेळी आपला भर एका गोष्टीवर असतो-योग्य कौशल्य आणि योग्य मार्गदर्शन.

मात्र आर्थिक निर्णयाच्या बाबतीत चित्र अनेकदा वेगळे दिसते. तो आपला माणूस आहे... त्याच्याशी जुने संबंध आहेत... त्याने सांगितले आहे म्हणून ... आपल्या ग्रुपमधले सगळे तिथेच गुंतवत आहेत... असे अनेक विचार आपल्या निर्णयांमध्ये नकळत प्रवेश करतात. याचा अर्थ नातेसंबंध चुकीचे आहेत, असा अजिबात नाही. नातेसंबंध जपलेच पाहिजेत. पण आर्थिक निर्णयांचा पाया नात्यावर असावा की समजुतीवर, हा प्रश्न मात्र प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा.

कारण पैसा केवळ गुंतवला जात नाही; तो आपल्या भविष्यातील जबाबदाऱ्यांना जोडलेला असतो. मुलांचे शिक्षण, निवृत्ती, आरोग्य, कुटुंबाची सुरक्षितता-या सर्व गोष्टींचा पाया आपल्या आजच्या निर्णयांवर उभा असतो. अपूर्ण माहिती अनेकदा पूर्ण खात्री निर्माण करते, तर समजूतदारपणा अनेकदा प्रश्न विचारण्यापासून सुरू होतो.

चांगला आर्थिक निर्णय म्हणजे फक्त योग्य योजना निवडणे नाही; तर निर्णय घेताना आपल्या विचारांवर कोणाचा प्रभाव आहे, हे ओळखणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

प्रभाव बाहेरून येऊ शकतात. परिणाम मात्र आपलेच असतात.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

- **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# ट्रान्सफॉर्मर कंपनीच्या गोडावूनमधून २ लाख ४० हजारांच्या कॉपरची चोरी

नगर - शहर परिसरातील अरणगाव रोडवर असलेल्या एका ट्रान्सफॉर्मर कंपनीचे शटर उचकटून चोरट्यांनी तब्बल २ लाख ४० हजार रुपये किमतीची तांब्याची तार चोरून नेल्याची घटना २४ जुलै रोजी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तीन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गौरव संजय गाजरे (वय ३०, रा. आगरकर मळा, स्टेशन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची अरणगाव रोडवरील हॉटेल सुरजसमोर 'अ‍ॅम्पीयर ट्रान्सफॉर्मर' नावाची कंपनी आहे. २४ जुलै रोजी पहाटे सुमारे २.२९ वाजता तीन अज्ञात चोरट्यांनी कंपनीच्या मागील बाजूचे शटर उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कंपनीत व्यवस्थित मोजून ठेवलेले तब्बल २०० किलो वजनाचे तांबे (कॉपर) चोरून नेले.

सकाळी हा प्रकार लक्षात आल्यानंतर गौरव गाजरे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी बी.एन.एस. कलम ३०५ (अ), ३३१ (४) आणि ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# शेत जमिनीत अनाधिकाराने घुसून केला एकाचा दफनविधी

## अरणगाव शिवारातील घटना, तिघांसह इतर १० ते १५ जणांवर गुन्हा दाखल

नगर - नगरमधील व्यावसायिकाच्या शेत जमिनीत अनाधिकाराने घुसून विनापरवाना व बेकायदेशीरपणे एकाचा दफनविधी केल्याप्रकरणी तीन जणांसह इतर १० ते १५ लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आरणगाव शिवारातील नगर-दौंड रस्त्यावरील जागेत घडली.

याबाबत संजय रुपचंद ताथेड (वय ५८, रा. जैनपार्क, सिताबन लॉन शेजारी, कोठी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या मुलीच्या मालकी हक्काची आरणगाव शिवारात जागा आहे. आरोपी उषा सुदाम कांबळे, डायना सुदाम कांबळे आणि विनोद शिंदे (सर्व रा. मुंबई) तसेच त्यांच्यासोबत असलेल्या १० ते १५ लोकांनी मालकाची कोणतीही परवानगी किंवा संमती न घेता या जागेवर बेकायदेशीरपणे प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी सुदाम महादेव कांबळे यांचे प्रेत त्या जागेत दफन करून अतिक्रमण केले. याप्रकरणी संजय ताथेड यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार नितीन गांगुर्डे हे करत आहेत.

# रामवाडी येथे तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर - शहर परिसरातील रामवाडी येथे एका तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २४ जुलै रोजी सायंकाळी घडली आहे.बॉबी सुरेश गायकवाड (वय २७, रा. रामवाडी, अहिल्यानगर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

बॉबी गायकवाड याने राहत्या घरी गळफास घेतला. ही बाब लक्षात येताच त्याचा भाऊ राम सुरेश गायकवाड याने त्याला तातडीने रात्री ८.५५ वाजेच्या सुमारास उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे यांनी तपासणी करून त्याला उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या घटनेची माहिती तोफखाना पोलीस पोलिसांना देण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी याप्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# नगरमध्ये पुन्हा ५.८३ लाख रुपयांचे 'एमडी' ड्रग्ज जप्त

## राजस्थानच्या तरूणाला पोलिसांनी केली अटक

नगर - तोफखाना पोलिसांनी सावेडी उपनगरात एम डी ड्रग्ज पकडल्याची घटना ताजी असतानाच एमआयडीसी पोलिसांनीही निंबळक बायपास भागात मोठी कारवाई करत सुमारे ५ लाख ८३ हजार २०० रुपये किमतीचे २९.१६ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) हे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी राजस्थान येथील एका तरूणाला अटक केली आहे. आरोपीकडून गाडी आणि मोबाईलसह एकूण ११ लाख ४३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे, तर त्याचे दोन साथीदार घटनास्थळावरून पसार झाले आहेत.

गस्तीवर असताना पोलिसांना निंबळक बायपास येथील लामखेडे पेट्रोल पंपाजवळ दोन गाड्या संशयास्पद उभ्या असल्याचे दिसले. पोलीस चौकशीसाठी पुढे गेले असता, एका गाडीतील दोघे जण पळून गेले. मात्र, पोलिसांनी दुसऱ्या विनानंबर स्विफ्ट कारजवळ उभ्या असलेल्या तरूणाला पकडले. चौकशीत त्याने आपले नाव रविप्रकाश भेराराम बिश्नोई (वय २९, मूळ रा. राजस्थान, सध्या रा. करमाळा, जि. सोलापूर) असे सांगितले.



निंबळक बायपास वर एम डी ड्रग्ज विक्रीसाठी आलेल्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसीपोलिसांचे पथक.

संशय आल्याने पोलिसांनी पंचांसमक्ष गाडीची झडती घेतली. तेव्हा स्विफ्ट कारच्या मागील सीटवर प्लास्टिकच्या पिशवीत आणि तीन पुड्यांमध्ये एकूण २९.१६ ग्रॅम मेफेड्रोन ड्रग्ज सापडले. आरोपीने हे ड्रग्ज विक्रीसाठी आणल्याचे मान्य केले आहे. पळून गेलेल्या दोन साथीदारांपैकी एकाचे नाव तांबे असल्याचे समोर आले असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

हा ड्रग्जचा साठा राजस्थानमधून सोलापूरमार्गे अहिल्यानगरमध्ये विक्रीसाठी आणला जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे, अंमलदार संदीप पवार, उमेश शेरकर, सचिन हरदास, सूरज देशमुख व अक्षय रोहोकले यांच्या पथकाने ही कारवाई केली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोरेश्वर जानुजी इवळे यांचे दु:खद निधन

नगर - अहिल्यानगर येथील रहिवासी व सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेले मोरेश्वर जानुजी इवळे यांचे नुकतेच पुणे येथे निधन झाले.



त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर पुणे चिंचवड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## अ‍ॅड. धर्माजी जपकर यांचे अल्प आजाराने निधन

नगर - नेप्ती येथील रहिवासी अ.नगर बार असोसिएशनचे ज्येष्ठ सदस्य अ‍ॅड. धर्माजी लक्ष्मण जपकर (वय ७०) यांचे २५ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नेप्ती अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, भाऊ, भावजया, पुतणे असा मोठा परिवार आहे.

## रामदास दुसाने यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - श्रीरामपूर येथील वॉर्ड नं.७ येथील रहिवासी रामदास गंगाधर दुसाने (वय ८९) यांचे २५ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणतांबा येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ भाऊ, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

# एसटी बसमध्ये बसताना महिलेच्या साडेतीन लाखांच्या दागिन्यांची चोरी

## स्वस्तिक बसस्थानकावरील घटना, अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - शहरातील गर्दीच्या स्वस्तिक बसस्थानकावर एसटी बसमध्ये चढताना एका महिलेचे साडेतीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना २४ जुलै रोजी सायंकाळी घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वैशाली देवीदास कसाळ (वय ३४, मूळ रा. शेवगाव, सध्या रा. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २४ जुलै रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास स्वस्तिक बसस्थानकातून एसटी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी बसस्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी होती. या गर्दीचा गैरफायदा घेत एका अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समध्ये ठेवलेले दागिने चोरून नेले.

चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये २ लाख रुपये किमतीचे १८ ग्रॅमचे सोन्याचे मिनीगंठण, ४० हजार रुपयांची पिळ्याची अंगठी, ७० हजार रुपयांचे सोन्याचे इअररिंग, ४० हजार रुपयांची कानातील रिंग आणि लहान बाळाची १० हजार रुपयांची सोन्याची वाळी असा एकूण ३ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल समाविष्ट आहे.

दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच महिलेने तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख आणि पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फिर्यादी वैशाली कसाळ यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार सूर्यकांत डाके करत असून, बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्याचा शोध सुरू आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयापर्यंत होमिओपॅथी वैद्यक व शल्यचिकित्सा पदवी धारकांची नोंदणी स्थगित ठेवा

## इंडियन मेडिकल असोसिएशनची मागणी

नगर - मुंबई उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असताना होमिओपॅथी वैद्यक व शल्यचिकित्सा पदवी धारकांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल नोंदणी प्रक्रिया अंतिम निर्णय होईपर्यंत स्थगित ठेवावी, अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अहिल्यानगर शाखेने केली आहे. नोंदणी प्रक्रिया सुरू झाल्यास रुग्णांच्या सुरक्षेसाठी आणि वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेच्या संरक्षणासाठी राज्यव्यापी वैद्यकीय सेवा बंद आंदोलनासह लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही आयएमएने दिला आहे.

आयएमएने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे, होमिओपॅथी वैद्यक व शल्यचिकित्सा पदवी धारकांच्या एमएमसी नोंदणीसंदर्भातील प्रकरण सध्या मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद पूर्ण झाला असून पुढील सुनावणी १३ व १४ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे. त्यामुळे न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत कोणतीही नोंदणी प्रक्रिया राबवू नये. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना नोंदणीसारखी कार्यवाही करणे हे न्यायप्रक्रियेच्या उद्देशाला बाधा आणणारे ठरू शकते. तसेच आवश्यक कार्यपद्धती निश्चित केल्याशिवाय कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र जारी करू नये, अशी मागणीही केली आहे.

आयएमएने राज्य शासनाच्या २३ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचा उल्लेख करत महाराष्ट्रात एमबीबीएस डॉक्टरांची कमतरता नसल्याने बंधनकारक सेवा बॉन्ड सर्विस रद्द करण्यात आल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे उउचझ अभ्यासक्रमाची आवश्यकता उरत नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. तसेच सेंट्रल कौन्सिल ऑफ होमिओपॅथीनेही सीसीएमपी अभ्यासक्रमाला विरोध दर्शविल्याचे सांगत, या अभ्यासक्रमाच्या आधारे कोणतीही नोंदणी अथवा शासकीय मान्यता देऊ नये, अशी मागणी आयएमए अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी आणि सचिव डॉ. अमित करडे यांनी केली आहे.

# १००० कोटींच्या कर्जाला ब्रेक; ठाकरे सेनेच्या दबावामुळे सत्ताधाऱ्यांची माघार

## शहरप्रमुख किरण काळे यांचा दावा

नगर - मनपाच्या एक हजार कोटी रुपयांच्या कर्ज प्रस्तावाला ठाकरे शिवसेनेने केलेल्या तीव्र विरोधामुळे अखेर प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांना माघार घ्यावी लागल्याचा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगरप्रमुख किरण काळे यांनी केला आहे. पाणी योजना, भुयारी गटारी साठीचा कर्जाचा प्रस्ताव देखील ठाकरे शिवसेनेच्या विरोधामुळे गुंडाळावा लागल्याचा दावा ही काळे यांनी केला आहे.

२५ जुलै रोजी झालेल्या महासभेत प्रोफेसर चौक, सावेडी आणि गंज बाजार येथील तीन व्यापारी संकुले बीओटी तत्त्वावर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. तर नेहरू मार्केट आणि रंगभवन या दोन संकुलांबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार महापौरांना देण्यात आले. प्रशासन, सत्ताधारी हे ठाकरे शिवसेनेच्या विरोधामुळे झुकले. मनपाला यू-टर्न घ्यावा लागला. हा निर्णय म्हणजे ठाकरे शिवसेनेने उभारलेल्या जनदबावाचा विजय असल्याचा दावा काळे यांनी केला.

काळे यांनी सांगितले की, महापालिकेमध्ये ठाकरे शिवसेनेकडे संख्याबळ नसले तरी देखील सभागृहा बाहेरून हा दबाव आम्ही सत्ताधाऱ्यांवर निर्माण केला. त्यामुळेच सत्ताधाऱ्यांना देखील अखेर कर्जाला विरोध करण्याची उपरती झाली. मनपाची ढासळलेली आर्थिक स्थिती लक्षात घेता एवढे मोठे कर्ज शहरासाठी घातक ठरणार असल्याचे ठाकरे शिवसेनेने वारंवार स्पष्ट केले होते. याच अनुषंगाने वर्ल्ड बँकेला पत्र पाठवून मनपाची आर्थिक स्थिती, संभाव्य आर्थिक धोके या बाबींचा कर्ज देताना गंभीरपणे विचार करण्याची मागणी काळे यांनी केली होती.

### पाणीपुरवठा योजनांच्या चौकशीकडे लक्ष

पाणीपुरवठा योजना अथवा भुयारी गटार योजना यापैकी एका योजनेसाठी शेकडो कोटी रुपयांच्या कर्जाचा प्रस्ताव मनपा समोर होता. मागील रद्द झालेल्या महासभेत हे विषय चर्चिले जाणार होते. मात्र ठाकरे शिवसेनेच्या वतीने किरण काळे यांनी यापूर्वी राबवण्यात आलेल्या अमृत, फेज टू यासह सर्व योजनांची सखोल चौकशी, आर्थिक लेखा परीक्षण करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ३ जूनला केली आहे. मुख्यमंत्र्यांनी पुढील कारवाईसाठी नगर विकास खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. गोविंदराज यांच्याकडे ती तक्रार ८ जून रोजी पाठवली आहे. आता याबाबत सरकारकडून चौकशी होणार काय याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### ६० नंतरही ठेवा हाडे मजबूत

६० नंतर वय वाढल्याने हाडे ठिसूळ होतात आणि पडून फ्रॅक्चर होण्याचा धोका वाढतो. पण योग्य आहार आणि सवयींनी हाडे मजबूत ठेवता येतात. आधुनिक वैद्यकशास्त्रानुसार ऑस्टिओपोरोसिस टाळण्यासाठी हे ४ मार्ग नक्की पाळा. हाडांसाठी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन D हे दोन महत्वाचे घटक आहेत. दूध, दही, ताक, रागी, तीळ आणि पालेभाज्यांमध्ये कॅल्शियम भरपूर असते. सकाळी १५ मिनिटे उन्हात बसल्याने शरीरात नैसर्गिकरित्या व्हिटॅमिन D तयार होते आणि कॅल्शियमचे शोषण चांगले होते. हाडे मजबूत ठेवण्यासाठी प्रथिने देखील आवश्यक आहेत. डाळी, अंडी, सोयाबीन आणि नट्स रोजच्या जेवणात असावेत. फक्त आहार पुरेसा नाही. वापरा नाहीतर गमावा हा नियम हाडांनाही लागू पडतो. रोज ३० मिनिटे चालणे, जिना चढणे आणि हलके व्यायाम केल्याने हाडांची घनता वाढते. घरात योगा, प्राणायाम आणि खुर्चीच्या आधाराने उठ-बस करणे देखील फायदेशीर ठरते. यामुळे तोल सांभाळण्याची क्षमता वाढते आणि पडण्याचा धोका कमी होतो. धुम्रपान, जास्त चहा-कॉफी आणि मद्यपान हाडांसाठी घातक आहे. त्याऐवजी पाणी जास्त प्या आणि मीठ कमी खा. ६० नंतर वर्षातून एकदा BMD टेस्ट म्हणजेच Bone Density Test करून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे हाडांची कमजोरी लवकर लक्षात येते. सहज उपलब्ध आणि स्वस्त उपायांनीही आपण म्हातारपणातही ताठ मानेने उभे राहू शकतो. लक्षात ठेवा, महागड्या औषधांपेक्षा शिस्तबद्ध जीवनशैलीच हाडांसाठी सर्वात मोठे 'सुपरफूड' आहे.

## पाककला

### बेसन ढोकळा

**साहित्य :** बेसन १ वाटी, रवा २ चमचे, दही ३ चमचे, आले-लसूण पेस्ट १ चमचा, हळद १/४ चमचा, मीठ चवीनुसार, साखर १ चमचा, लिंबाचा रस १ चमचा, इनो पावडर १ छोटा पुडा, पाणी अर्धी वाटी तेल २ चमचे, मोहरी १ चमचा, तीळ १ चमचा, हिरवी मिरची २, कढीपत्ता ८-१० पाने, साखर १ चमचा, पाणी १ वाटी, कोथिंबीर बारीक चिरलेली २ चमचे

**कृती :** एका भांड्यात बेसन, रवा, दही, आले-लसूण पेस्ट, हळद, मीठ आणि साखर घालून एकजीव करा. त्यात थोडे थोडे पाणी घालून घट्टसर बॅटर तयार करा. १५ मिनिटे झाकून ठेवा. ढोकळा बनवण्यापूर्वी कुकरमध्ये २ ग्लास पाणी घालून स्टँड ठेवा आणि गरम करा. बॅटरमध्ये लिंबाचा रस आणि इनो पावडर घालून हलक्या हाताने मिक्स करा. लगेचच बटर लावलेल्या डब्यात ओतून १५-२० मिनिटे वाफवून घ्या. टूथपिक टोचून बघा, स्वच्छ बाहेर आली की ढोकळा तयार आहे. दुसरीकडे एका पॅनमध्ये तेल गरम करून त्यात मोहरी, तीळ, हिरवी मिरची आणि कढीपत्ता यांची फोडणी करा. त्यात १ वाटी पाणी आणि १ चमचा साखर घालून एक उकळी काढा. ही फोडणी तयार ढोकळ्यावर चमच्याने पसरवा. वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. तयार ढोकळ्याचे चौकोनी तुकडे करून हिरव्या चटणी आणि गोड चटणीबरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### उशी संबंधी शास्त्र

उशी म्हणजे आपल्या डोक्याचे स्थान आहे. इथे फक्त स्वच्छ उशी आणि मऊ कपडा असावा. अनावश्यक वस्तू ठेवणे म्हणजे आपल्याच प्रगतीला अडथळा करणे आहे. जुन्या आठवणींचे पत्र उशीखाली ठेवल्याने भूतकाळात अडकून पडता. नवीन संधी येत नाहीत.

## सौंदर्य

आठवड्यातून फक्त २ वेळाच हा स्क्रब करावा. जास्त वेळा केल्याने स्किन कोरडी होते. स्क्रब करताना खूप जोर लावू नये.

## सल्ला

गरम भातावर केवड्याचे पान ठेवल्यास त्याचे तेल निघते आणि पूर्ण भातात मिसळते. त्यामुळे भाताला मोगऱ्यासारखा मंद सुगंध येतो. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २६ जुलै २०२६

**प्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, ज्येष्ठा ०७।३५, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ४ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आजचा दिवस कामात व्यस्त राहील. जुने मित्र भेटतील. आर्थिक स्थिती स्थिर.

**वृषभ :** घरातील वातावरण आनंदी. प्रवासाची शक्यता. आरोग्याकडे लक्ष द्या.

**मिथुन :** नवीन संधी मिळू शकतात. शिक्षणात प्रगती. खर्च वाढतील.

**कर्क :** कुटुंबासोबत वेळ जाईल. मन प्रसन्न राहील. जुनी कामे पूर्ण होतील.

**सिंह :** कार्यालयात प्रशंसा मिळेल. आत्मविश्वास वाढेल. महत्त्वाचा निर्णय घेऊ शकता.

**कन्या :** दिवस संमिश्र. कामाचा ताण असेल. पण संध्याकाळी आराम मिळेल.

**तूळ :** भागीदारीत फायदा. सामाजिक कार्यक्रमात सहभाग. खर्चावर नियंत्रण ठेवाल.

**वृश्चिक :** आरोग्य चांगले. रखडलेली कामे मार्गी लागतील. धनलाभाची शक्यता.


**धनु :** विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस. सर्जनशीलता वाढेल. लहान प्रवास होईल.

**मकर :** घरातील कामात व्यस्तता. जमीन-घराशी संबंधित बाबींवर चर्चा होईल.

**कुंभ :** मित्रांची मदत मिळेल. नवीन कल्पना सुचतील. संवाद चांगला राहील.

**मीन :** आर्थिक बाबतीत दिवस चांगला. बचत वाढेल. अध्यात्माकडे कल.

## शब्दगंध क्र. ७४८१ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) सैन्य; फौज; ओडिशामधील एक प्रमुख शहर ४) खिडक्या वगैरेंना लावण्यात येणारी काच ७) पाहुणचार; आदरातिथ्य ९) गावाचे प्रवेशद्वार १०) परवानगीने काढलेली सुट्टी ११) पाणीदार; चपळ १२) लग्नासाठी खरेदी केलेल्या कपड्यांचे गाठोडे १३) वरीलप्रमाणे १५) हरभऱ्याच्या डाळीचे पीठ १६) एक पक्षी; कावळा; वायस; काग १७) धागा; तंतू; दोरा १८) समय; अवकाश; विलंब २०) रड; रडगाणे २१) समुद्राच्या लाटांचा आवाज २३) टोकदार; नोकदार

**उभे शब्द :-** १) शहरातील जुनी वस्ती; पुण्यातील एक प्रसिद्ध पेठ २) उपहास; फजिती; हुर्यो ३) दफनभूमी ४) मोठी बहीण ५) शत्रू; फिर्यादी; दुष्मन; हक्क सांगणारा ६) धमनी; रक्तवाहिनी; नाडी; शीर ८) नृप; भूपती; राणीचा नवरा; किंग ११) किल्ल्याभोवताली खोदलेला चर १२) बसण्यासाठीचे छोटे वस्त्र; आसन १३) सूर्योदयानंतरचा काही काळ १४) हुलकावणी; बतावणी; गप्प १५) ज्याला कोणी वारस नाही असा १८) बैलाला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याच्या नाकातून ओवतात ती दोरी १९) मागणीचा लकडा २२) तापामुळे तोंडापाशी उठणाऱ्या बारीक पुटकुळ्या; ज्वर; ताप

### शब्दगंध क्र. ७४८० चे उत्तर




# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

**सुविचार** : नामस्मरण ही मनाला मिळणारी सर्वात मोठी शांती आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपण डोळे का मिचकावतो?

एकविसाव्या शतकात डोळे हे आपल्या शरीराचे सर्वात महत्वाचे इंद्रिय बनले आहेत. वाचणे, खेळणे, टीव्ही पाहणे, मोबाईल वापरणे या सर्वांसाठी डोळे अत्यावश्यक आहेत. पण तुम्ही कधी विचार केला आहे का, आपण दिवसभरात हजारो वेळा डोळे का मिचकावतो? ही क्रिया आपल्या नकळत होते आणि ती थांबवणे खूप अवघड आहे. सर्वात महत्वाचे कारण म्हणजे डोळ्यांचे संरक्षण करणे. आपले डोळे अतिशय नाजूक असतात. चालताना धूळ, धूर, कचरा डोळ्यात जाऊ नये म्हणून डोळे पटकन मिचकावतात. हे अगदी पापणीचे नैसर्गिक सुरक्षा कवच आहे. वारा जोरात वाहत असेल किंवा कोणी अचानक हात जवळ आणला तरी डोळे आपोआप मिचकावतात. दुसरे कारण म्हणजे डोळे ओले ठेवणे. डोळ्याच्या पृष्ठभागावर अश्रूंचा एक पातळ थर असतो. आपण डोळे मिचकावतो तेव्हा ही अश्रूंची पातळी पूर्ण डोळ्यावर पसरते. त्यामुळे डोळे कोरडे पडत नाहीत, खाज सुटत नाही आणि दृष्टी स्वच्छ राहते. जर आपण डोळे मिचकावले नाहीत तर ५ मिनिटातच डोळे कोरडे होऊन जळजळ करायला लागतील.

तिसरे कारण म्हणजे डोळ्यांना विश्रांती देणे. सतत स्क्रीनकडे पाहताना किंवा पुस्तक वाचताना डोळ्यांवर ताण येतो. त्या वेळी जास्त वेळा डोळे मिचकावल्याने डोळ्यांच्या स्नायूंना आराम मिळतो. म्हणूनच कॉम्प्युटरवर काम करताना डोळे जास्त मिचकावतात.चौथे कारण म्हणजे घाण साफ करणे. डोळे मिचकावल्याने डोळ्यात गेलेली छोटी धूळ किंवा कचरा अश्रूंसोबत बाहेर ढकलला जातो. डोळ्याच्या कोपऱ्यात पाणी येणे हेच याचे उदाहरण आहे. शेवटी, आपला मेंदू दर २ ते १० सेकंदांनी एकदा डोळे मिचकावण्याचा आदेश देतो. सरासरी एक व्यक्ती दिवसाला १५,००० ते २०,००० वेळा डोळे मिचकावते. झोपेत मात्र आपण डोळे मिचकावत नाही. थोडक्यात, आपण डोळे मिचकावतो कारण त्यामुळे डोळे सुरक्षित राहतात, ओले राहतात, स्वच्छ होतात आणि त्यांना विश्रांती मिळते. निसर्गाने दिलेली ही एक छोटी पण खूप महत्वाची सवय आहे.

### ज्ञानाची शक्ती

एका गावात रामू नावाचा हुशार पण गरीब मुलगा राहत होता. त्याला पुस्तके वाचायची आणि नवीन गोष्टी शिकायची खूप आवड होती. गावच्या पाटलाचा मुलगा मोहन श्रीमंत पण आळशी होता. तो नेहमी रामूला म्हणायचा, तुझ्याकडे ताकद नाही, तू काय करणार?


एके दिवशी मुसळधार पावसाने डोंगरावरून एक मोठा दगड घसरून गावाचा रस्ता बंद केला. गावात एका आजारी आजीला औषध आणणे गरजेचे होते. पाटील आणि गावातील सर्व धिप्पाड लोकांनी खूप शक्ती लावली, पण दगड हलला नाही.

मोहन म्हणाला, अजून लोक बोलवा. तेव्हा रामू पुढे आला. तो म्हणाला, फक्त शक्ती नको, ज्ञान लागेल. त्याने सुताराकडून वासा, दोर आणि लहान दगड घेतले. त्याने दगडाखाली वासा लावून इर्शीशी च्या मदतीने तो दगड सहज बाजूला केला. १० मिनिटात रस्ता मोकळा झाला आणि औषध वेळेवर पोहोचले.

सगळे अवाक झाले. पाटील म्हणाले, आज कळले, शक्तीपेक्षा ज्ञान मोठे असते. मोहनलाही त्याची चूक समजली आणि तो म्हणाला, आजपासून मी पण तुझ्यासोबत शिकेन.

बोध : ताकद नसली तरी चालेल, पण ज्ञान असेल तर अशक्य कामही शक्य होते. म्हणूनच ज्ञान हीच खरी शक्ती आहे.

## आत्मशक्ति



### संघर्ष

कधी कधी असे घडेल की आपल्या जवळच्या नातेवाईकाला जीवघेणा आजार जडेल व त्यांच्या अखेरच्या दिवसांत आम्हाला त्याची साथ करावी लागेल. आग, वादळ आणि महापुरांनी आमचा घरसंसार पार उध्वस्त होईल. ज्या कंपनीत आपण नोकरी करतोय ती जर डबघाईला आली तर पुढे काय कामधंदा करायचा याबाबत प्रश्नचिन्ह असतांना आम्हाला नोकरी सोडावी लागते. काही ठरावीक लोकच फक्त स्वतः चे जीवन त्रास व संघर्षाविना व्यतीत करतात. सध्या आम्ही मोठ्या आरामात जीवन जगत असू परंतु हे सुखी जीवन असेच कोणत्याही अडथळ्याशिवाय व त्रासाविना चालू ठेवू शकू अशी खात्री बाळगता येत नाही. गौतम बुध्दांच्या मोहरीच्या गोष्टी वरून ही बाब नीट स्पष्ट होते. एकदा गौतम बुध्दांकडे एक स्त्री रडत आली. तिचा एकुलता एक मुलगा (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### मुलांचे कल्याण

सुरेश ओबेरॉय :

आणि मग आपल्या घरातल्या सदस्यांचं वागणं बदलायला लागतं.

शिवानीदीदीः कारण एक अस्वस्थ, वादळी ऊर्जा घरात प्रवेश करते.

सुरेश ओबेरॉय : घरातल्या पाळीव प्राण्यांनाही बेचैन वाटतं आणि ते लपून बसतात. शिवानीदीदी : आपली स्पंदनं अशा प्रकारे परिणाम करतात. भीती आणि नकारात्मकता जेव्हा घरात शिरते तेव्हा ती लहान मुलांवरही परिणाम करते. त्यांची चूक नसतानाही त्यांना सारखं रागवलं जातं कारण आपण मोठी नकारात्मक ऊर्जा घेऊन वावरत असतो. जेव्हा आपण स्वतःची काळजी घेत नाही तेव्हा आपली नाती गुंतागुंतीची बनतात. आता आपल्याला ही पद्धत बदलायला हवी आणि आपल्या मानसिक स्थितीचा परिणाम आपल्या कुटुंबावर होतो, हे समजून घ्यायला हवं.

आपण जर कोणाला विचारलं की, एवढ्या अडचणी असतानाही तुम्ही इतके कष्ट का करता, तुम्ही तुमच्या तब्येतीकडे लक्ष का देत नाही?

सुरेश ओबेरॉय : ते म्हणतील, हे आम्ही आमच्या मुलाबाळांसाठी करत आहोत.

शिवानीदीदी : त्यांना काय द्यायचं आहे त्यांच्या मुलांना ? (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : आकाश निळे का दिसते?

विद्यार्थी : सर, रंगाचा खर्च वाचवण्यासाठी

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जागतिक पर्यावरण दिन कधी असतो?

– ५ जून

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'विठ्ठलानं दिलेली सुवर्णसंधी...'

त्याचा जन्म झाला. संपूर्ण कुटुंबाला अत्यानंद झाला. गावभर पेढे वाटले. बाळ घरी आल्यावर अत्यंत उत्साहानं त्याचं स्वागत केलं. त्या बाळाचं पाहाणं खूपच आनंददायी वाटु लागलं घरातल्या प्रत्येकाला. त्याला मांडीवर घेणं, खेळवणं, त्याच्यासोबत बोबडं बोलणं, त्याची पप्पी घेणं... सारं कसं अत्यानंद देऊ लागलं. दिवसांमागुन दिवस जाऊ लागले. बाळ मोठं होऊ लागलं. त्याचं नाव ठेवलं– स्वर. स्वरचं भिंतीला धरुन चालणं, उभा राहाणं... सारंच लोभसवाणं, हवहवसं. पावलांचा आकार वाढु लागला. घरात प्रत्येक एकादशीला भजन असायचं. विठु माऊली, तू माऊली जगाची... ह्या भक्तिगीतासह अनेक गाणी ऐकली जायची अत्यंत भक्तिभावानं. स्वरही विठ्ठलाच्या मुर्तीकडे पाहात राहायचा. स्वर शाळेत जाऊ लागला. अक्षरं, वाक्य गिरवु लागला. एकेक इयत्ता पुढे पुढे जाऊ लागला. महाविद्यालयात प्रवेश घेतला. स्वर अभ्यासात, वक्तृत्वात हुशार. वकृत्व स्पर्धेत बक्षिस मिळालं की देव्हाऱ्याजवळ येऊन उभा राहायचा. विठ्ठला असाच माझ्या पाठिशी उभा राहुन मला यशस्वी कर म्हणायचा. मी अथक परिश्रम करायला तयार आहे म्हणायचा. पदवीधर झाला. चांगल्या कंपनीत नोकरी लागली. मन एकाग्रतेनं काम करु लागला. लग्नासाठी स्थळं येऊ लागली. अनुरुप मुलीसोबत लग्न जमलं. घरातलं वातावरण अत्यंत छान झालं. लग्नाला आठ दिवस राहिले. रस्ता अपघातात मुलीचा एक पाय गेला. स्वर, खुपच दुःखी झाला. मुलीच्या घरचे काळजी करु लागले. स्वरने सासऱ्याला फोन केला. – 'बाबा, तुम्ही काळजी करु नका. मी, तुमच्या मुलीसोबतच लग्न करणार.'

सासऱ्याला खुप छान वाटलं, त्यांचं नैराश्य नाहिसं झालं. कुबडीच्या आधाराने स्वराली चालु लागली. एके दिवशी स्वर कंपनीतुन आल्यावर विठ्ठलाच्या मुर्तीसमोर उभा राहिला. म्हणाला, 'विठ्ठला, तु माझं चांगलंच केलं आहे. ह्यापुढेही तु माझं चांगलंच करणार आहेस. पण माझी जीवनसाथी एका पायावर आख्खं आयुष्य व्यवस्थित राहिल का?'

स्वरनं दोन्ही डोळे मिटवुन घेतले. ध्यान केलं. साधारण १५ मिनीटांनंतर तो ध्यानातुन बाहेर आला. डोळे उगडले. आवाज आला – 'स्वर, तु खुप समंजस आहेस. हुशार आहेस. स्वराली ह्या अपघातातुन वाचली. तो अपघात तिच्या एका पायावर निभावलाय हे लक्षात घे. समजा त्या अपघातात तिचे दोन्ही पाय गेले असते तर? समजा त्या अपघातात तिचे दोन्हीही हात आणि दोन्हीही पाय गेले असते तर? अगदी वाईटात वाईट विचार कर.'– मग मात्र स्वरच्या डोळ्यातं आसवं जमा झाली. पुन्हा आवाज आला. – 'स्वर, मनुष्य जीवन एकदाच मिळतं. ह्या मनुष्य जीवनात, स्वतःचा जीव जेवढा महत्वाचा आहे तेवढाच दुसऱ्यांचाही जीव महत्वाचा आहे. थोडा वेळ विचार करुन सांग. तुझ्या जीवनात अत्यंत महत्वाचं काय आहे?' स्वर विचाराधिन झाला. आई, वडिल, सासु, सासरा स्वरालीसह मित्र, नातेवाईक, परिचितांचाही त्याने विचार केला. शेवटी स्वतःचाही विचार केला. त्याच्या मनानं त्याला जे काही सांगितलं ते ऐकुन तो विठ्ठलाचं नामस्मरण करु लागला. बंद डोळ्यांसमोर विठुमाऊली दिसु लागली. त्याचं मन म्हणालं, 'खरच स्वराली शिवाय मी अपूर्ण आहे. विठ्ठलाने तिला वाचवलं आहे ह्यामागे नक्कीच चांगलं असं होणार आहे. मनुष्य जन्म आपल्याला लाभला ही एक सुवर्णसंधी आहे विठ्ठलानं दिलेली.

आपण हा विचार का करत नाही की आपलं जीवन ही विठ्ठलानं दिलेली सुवर्णसंधी आहे म्हणून. हा असा विचार केला तरच आपल्या मनुष्य जन्माचं, ह्या एकदाच मिळणाऱ्या जीवनाचं अमूल्यत्व समजेल. मनुष्यजन्म मिळणं अवघड आहे. मग हा मनुष्य जन्म मिळाल्याबद्दल विठुमाऊलीचे आभार किती व्यक्ती मानतात? अगदीच कमी व्यक्ती असतील अशा ज्या विठुमाऊलीचे आभार मानत असतील.' कुबडीच्या आधाराने स्वराली त्याच्याजवळ येऊन बसली. तिनं स्वरचा हात स्वतःच्या हातात घेतला. त्या स्पर्शाची ऊब त्याला प्रसन्नता देऊ लागली. 'स्वराली, दोन्ही डोळे मिटवुन घे. विठुमाऊलीचे मनापासून आभार मान आपल्याला मनुष्य जन्म दिल्याबद्दल.' स्वराली म्हणाली, 'मी सुध्दा आता हाच विचार करत होते म्हणूनच तुझ्याजवळ येऊन बसले. तुझा हात, माझ्या हातात घेतला. म्हणजे विठ्ठलाचा हात, माझ्या हातात घेतल्यासारखं वाटलं मला. स्वर, आपण प्रत्येकाने आपल्या आतला विठ्ठल पाहायलाच पाहिजे. विठ्ठल, नामस्मरण, भगवा ध्वज, टाळ, चिपळ्या, लाखो वारकऱ्यांचं विठ्ठलाच्या दर्शनाच्या ओढीने पायी चालणं, कपाळावरचा बुक्का, मृदुंग, भिमा नदी, पंढरपूरचं विठ्ठलाचं मंदिर, भजनात तल्लीन झालेले वारकरी... पाऊस रुपात जमिनीसोबत नातं जोडणारा पाण्याचा थेंब... खुप प्रसन्न वाटतं. विठ्ठलानं दिलेल्या ह्या मनुष्यरुपी सुवर्णसंधीचा योग्य उपयोग केला पाहिजे. तरच विठुमाऊली आपल्यावर प्रसन्न राहिल. (लेख क्र.६११)

– **सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### भोपळा

११) शरीरावर जर बेंड झाले असेल, तर ते फुटण्यासाठी भोपळा उकडून त्याचे पोटीस बांधावे. त्याचप्रमाणे भोपळ्याच्या पानांचेही पोटीस बांधावे. यामुळे बेंड पिकून फुटते व तेथील वेदना कमी होतात.

१२) मधमाशी, गोम, विंचू यांच्या दंशावर भोपळ्याचा वाळलेल्या देठाची पेस्ट करून लावावी. यामुळे विषाचा प्रभाव कमी होऊन दाह कमी होतो.

१३) तांबडा भोपळ्याच्या फोडी किंचित वाफवून सम प्रमाणात साखरेच्या पाकात टाकून त्यात केशर व विलायची टाकून त्याचा मुरांबा बनवावा. चक्कर येणे, शांत झोप न लागणे, मानसिक थकवा येणे या विकारांवर हा मुरांबा खाल्ल्यास ही सर्व लक्षणे कमी होऊन झोप शांत लागते.

सावधानता : भोपळ्याची वेल सुकून भोपळा परिपक्व झाल्यावरच तो आहारात वापरावा. कूष्माण्डं कोमलं विषमं म्हणजेच कच्चा, अपक्व भोपळा आहारात वापरू नये. कारण तो शरीरास विषासमान बाधक ठरू शकतो. म्हणून नेहमी आहारामध्ये चांगला पिकलेला जुना भोपळा वापरावा. तो नक्कीच शरीरास गुणकारी ठरतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# पांडुरंग कांती, दिव्य तेज झळकती...

अवघ्या भोळ्या भाबड्या भक्तांचं वारकऱ्यांचं वैष्णवांचं आराध्य दैवत कानडा राजा पंढरीचा.. पांडुरंग..हे पांडुरंग नाव याविषयी आपण कधी सूक्ष्म विचारही करत नाही.. पांडुरंग म्हणजे पांढरा रंग...

रंगांची ही कहाणी, आहे माणसाच्या अस्तित्वा इतकीच पुराणी .. रथसप्तमीच्या सणाला सूर्याच्या रथाला जोडलेले काल्पनिक सात घोडे.. म्हणजे सप्तरंग जेव्हा फिजिक्स मध्ये आपण शिकतो काचेच्या लोलका मधून म्हणजे प्रिझम मधून त्या सात किरणांचे दिसणारे अंतरंग त्या भिंगातून सगळी किरणं एकवटली गेल्यानंतर त्या सात रंगांचा पुन्हा कागदावर एकच पांढऱ्याशुभ्र रंगाचा ठिपका तयार होतो, हे आपण शाळेत केलेल्या या विज्ञानातल्या प्रयोगाने मान्य केले.. आजच्या आधुनिक युगात सगळ्या संकल्पना प्रयोग आणि निष्कर्ष आपल्याला माहित आहेत.. परंतु जेव्हा ब्रम्हांडा मधल्या आणि विज्ञाना मधल्या सूक्ष्म अतिसूक्ष्म अणु आणि रेणू हे शब्द आणि संकल्पना देखील अस्तित्वात नव्हत्या तेव्हा तुकाराम महाराज म्हणाले की, अणु रेणू या तोकडा.. तु का आकाशा एवढा..




अनु म्हणजे टम या शब्दाची व्याप्ती समजण्यासाठी कोणत्या विश्व विद्यापीठात गेले होते हे संत? कुठून प्राप्त झाले हे दिव्य ज्ञान? याचे उत्तर नाही, तरी देखील काही अज्ञानी फॅडीस्ट स्वतःला नास्तिक म्हणून घेण्यामध्ये मोठेपणा मानतात...

सगळ्या प्रकारचे विश्वाचे रंग, अनुरंग, रागरंग, तरंग, सामावून घेऊन शेवटी त्याचं एकाच स्वच्छ, पारदर्शक, निखळ पांढऱ्या शुभ्र रंगात रूपांतर होऊन विश्वाच्या कल्याणासाठी मूर्त रूप धारण केलेला तो पांडुरंग... पांडुरंग या शब्दामध्ये किती गहन अर्थ सामावलेला आहे, स्वतःला अतिशहाणं आणि हटके, पुरोगामी सिद्ध करण्यासाठी आपण आपल्याच परंपरांना आणि पूर्वजांना नेहमीच वेड्यात काढायचं फॅड जरा बाजूला ठेवलं तर, त्या रूढी परंपरा मधून हेटाळणी बाजूला ठेवली तर विशाल अर्थ निघतो भक्तीची आणि शक्तीची उपासना पांडुरंगाच्या अविरत जयघोषातून केली, अशा या पांडुरंग शब्दाचा साधा सोपा सरळ अर्थ म्हणजे पांढरा रंग आणि हा रंग म्हणजे वेगळा कुठला रंग नसून सात रंगांचं मिश्रण आहे हे विज्ञानाने सिद्ध केलं आहे.. अवघा रंग एक झाला.. रंगी रंगला श्रीरंग...

आपण घरात देखील याचा प्रयोग करून पाहू शकता रंग पेटीमधले सगळे रंग विशिष्ट प्रमाणामध्ये जर एकजीव केले तर सर्वात शेवटी पांढराच रंग तयार होतो.. अगदी अडाणी माणसाला देखील समजेल असे सात रंगाचं जत्रेतलं भिरभिर जे वेगाने फिरताना त्यातले रंग न दिसता ते चक्र फक्त पांढऱ्या शुभ रंगाचंच दिसतं, हे त्याचं उत्कृष्ट उदाहरण आहे.

आजकाल जो तो जो तो आपला रंग शॅमेलियन सरड्या सारखा बदलत असल्यामुळे समाज बेरंग होत चालला आहे.. वैचारिक प्रदूषणामुळे आसमंता मधले इंद्रधनुष्य सुद्धा ब्लॅक अँड व्हाईट दिसायला लागले आहे.

आपण अति आधुनिक युगामध्ये वावरतो आहोत, आपल्या हातात मोबाईल नावाचं उधार ज्ञानाचं विश्वविद्यापीठ खिशात घेऊन हिंडतो आहोत.. कुठे जायचं असेल तर गुगल लोकेशन सर्च करतो, ते लावल्याशिवाय गाडी स्टार्ट होत नाही.. अशी अवस्था आहे की गुगल लोकेशन लावल्याशिवाय कुणी कुठे पोहोचूच शकत नाही..

पूर्वी एकदम तल्लख असलेला सगळे रस्ते गल्ल्या भोळा चौक तोंडपाठ असलेला आपला मेंदू आता न वापरल्यामुळे इतका निरुपयोगी होत चाललेला आहे.. अंध व्यक्तीच्या हातात काठीला जेवढं महत्त्व आहे तेवढं महत्त्व आज डोळे असलेल्या माणसासाठी देखील गुगल लोकेशनला आहे..

त्या गुगल लोकेशन चा जो सिम्बॉल आहे, जो लोगो आहे, जे चिन्ह आहे त्याचं बारीक निरीक्षण केलं तर. विठ्ठलाच्या कपाळावर असलेला टिळा हा जसून तसा गुगलने अनाहूतपणे सिंबॉल म्हणून निवडलेला आहे. कदाचित त्यांना हे चिन्ह विठ्ठलाच्या कपाळावर आहे हे माहितही नसेल, आणि त्याच्याशी काही देणं घेणंही नसेल.. पण ही सृष्टीची काय अकल्पनीय अशी व्यवस्था असावी.. की जे आयुष्यामध्ये शड्रिपुंच्या गर्दी मध्ये आणि संसाराच्या झोंबा झोंबीमध्ये सगळेच रस्ते भटकले आहेत.. त्यांना हे विठुरायाच्या कपाळावरचा गुगल लोकेशन चा टिळा योग्य मार्ग दाखवत असेल, विठुरायाच्या चरणी जीवनाचा खरा रस्ता आणि अर्थ समजत आणि उमजत असेल कदाचित.. त्यामुळेच लाखो वारकऱ्यांचा भक्ती सागर ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता दरवर्षी कोणतही लोकेशन न लावता, हातात भगवा घेऊन मनातल्या या पांडुरंगाच्या कपाळावरच्या गुगल टिळ्याकडे आकर्षित होऊन बेधुंद भक्तीने नाचत पंढरपुरात पोहोचतो.. आणि केवळ ओझरत्या दर्शनाने धन्य होतो.. आपण सर्वजण दररोज प्रचंड धावतो आहोत, पण पोहोचत कुठेच नाही..

आपल्याला ८४ लक्ष योनी मधून यावेळी माणसाच्या जन्माला घातल्याबद्दल त्या ब्रह्मदेवालाही पश्चाताप होऊ नये, यासाठी धर्म अर्थ काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ साध्य करण्यासाठी कुठलेही रस्ते न भटकता सुरक्षित पोहोचण्यासाठी एकच गुगल लोकेशन.. पांडुरंग... या पंढरीचे सुख, पाहता डोळा.. उभा तो जिव्हाळा योगीयांचा..

**– सुहासभाई मुळे, मोबा. ९८२३७२२२१२**

# प्रेरणादायी अक्षरधन

## श्रमविभाजन हवे

संकलन: दिशान फिचर्स




त्याला कधी कधी उशीर होतो. तो कारखान्यात उशिरा येतो. मी लगेच बाहेर जातो. दोघेही कारखान्याचे मालक, पण कधीही एकत्र नसतो. प्रत्येक पाहणारा म्हणतो, तो आला, हा गेला. त्यांना नको एकमेकांचे तोंड पाहायला। पण त्या प्रत्येकाने असा अर्थ का काढला ? केवळ त्याची सवयच कारण त्याला. दुसऱ्यातलं चांगलं काही दिसतच नाही त्या कुणाला? पण दुसऱ्यांना नाव ठेवून स्वतःला का नाव मिळायचे? संस्कृतातले हे सवाल जबाब ऐका प्रश्न टाकलाय. उदेतिसूर्यो गगने प्रभाते चन्द्रोस्तमायाति तदैव नित्यम। कस्मादभवेद वैरमुभौ मित्रे भो बाल। सर्व कथयस्व तन्ये ।।

जसा सुर्य आकाशात उगवतो, तसा चंद्र गायब होतो त्याच वेळी सुर्य तर मित्र ना चंद्राचा? नव्हे जगाचा? मग असं कशानं शुत्रत्व येतं दोघांत ? एक आला की दुसरा तिथून गेला ? दुसऱ्यानं ताडकन उत्तर दिलं. उदेति चन्द्रो गगने निशायां सुर्योस्मायाति तदैव नित्यम । वैर दयानैव च नैव चेदम विश्वं नियन्तुं श्रमयोर्विभागः ।। दोघांत शत्रुत्व मानायचं हा मूर्खपणाचं । जसा सुर्य उगवला अस्ताला । हे एका विसरता? जगाचं नियंत्रण करतात ते दोघं मिळून। कामाची वाटणी करुन सुर्य दिवसाला सांभाळतो. तर चंद्र रात्रीला. श्रमविभागणी म्हणतात. याला तेच कारण ठरते प्रगतीला काम चांगले व्हायला। परस्परांबद्दल प्रेम वाढायला । समतेवर आधारलेला टिकाउ मैत्री जगांपुढे मांडायला ।

तसं जग टपलेलंच असतं तुमचं उण पाहायला, तुम्हाला दुःखी करायला, पण आपण करावं पक्क आपल्या मनाल. संघर्ष करावा सतत जगाच्या दुष्टपणाशी एरवी दुबळ्या मनाचे राहिलात तुम्ही आणि शरण गेलात तर राहाल उपाशी.

संत तुकारामासारख्या संतानीही म्हणूनच म्हटलंय. रात्रंदिन आम्हा युदाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।।

सतत जागरुक राहायला हवं संसारात. तयारी ठेवली पाहिजे जरुर व्हा उतरायला युद्धात. ज्यांना माझे म्हणायचे त्यांचाही कुठं विश्वास? बाहेरचं जग तर सतत करते दुस्वास. मनाला त्यामुळे खंबीर ठेवावं लागतं खास.

पंचतंत्रातली एक कहाणी आहे. एका जंगलात राहायचे झाडाखलच्या बिळात उंदीर आणि तिथे दुपारी विश्रांतीला दिसायचे हत्ती. उंदीर दिसाचे नाहीत तेव्हा. मग लोक म्हणायचे भ्यालेत ना उंदीर हत्तीला, म्हणून पळालेत बिळात, हत्ती रात्री नसतात, कारण उंदीर चावतात ना त्यांना, शत्रु ते एकमेकांचे, रोज हत्ती कायचे विश्रांतीला. तेव्हा शिकारी प्रयत्न करायचे त्यांना पकडायला. रात्री बांधून ठेवायचे दोरांचे जाळे आणि तरी हत्ती न जाळ्यात सापडायचे.

हत्ती गेले की उंदीर यायचे बाहेर. खायचे कण हत्तींनी खाउन टाकलेल्या खाद्यातले। मांजरीचं भय नाही वाटायचं त्यांना ? उंदीरही सुरक्षित आणि हत्तीही सुरक्षित ।

उंदराना भय नाही हत्तीमुळे. रानमांजरं भ्यायची आणि फिरकायचीच नाहीत झाडाकडे शिकाऱ्यांनी बांधलेले जाळे उंदीर कुरतडून टाकायचे रात्रीतून. हत्ती व्हायचे निर्भय। तेव्हा जीवन सुरक्षित जगायला श्रमविभाजन आणि सहयोग यायचा कामाला। लोक रिकामेच नको. ते अर्थ काढायला । कर श्रमविभाजन व सहयोग । घे सर्वसुखाचे उपभोग।।

**– किशोर गांधी**



श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्या मंदिराच्या विद्यार्थ्यांनी काढलेली दिंडी.

# श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर शाळेची बाल वारकरी दिंडी उत्साहात

नगर – हिंद सेवा मंडळ संचलित श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्या मंदिराच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त शहरातून बाल वारकरी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी यांच्या पालखीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी हिंदसेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा, शाळेचे चेअरमन प्रकाश पोखरणा, शालेय समिती सदस्य अशोक कानडे, शालेय समिती सदस्या श्रीमती सुशीला मोडक, सौ. सुलभाताई कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ.रोहिणी फळे, बी.यु. कुलकर्णी, बबन धनवडे, नितीन केने,वृषाल एकबोटे, सुखदेव नागरे आदींसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

शाळेतील पालखी सोहळा चितळे रोड, नेता सुभाष चौक, नवी पेठ, लक्ष्मी कारंजा या ठिकाणाहून दिंडीची मिरवणूक काढण्यात आली. नवी पेठ येथे शहर सहकारी बँकेच्या वतीने माजी चेअरमन अशोक कानडे, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी दिंडीचे स्वागत केले. यावेळी शाळेतील मुलींनी भारुड, लेझीम पथक सादर केले. दिंडीचा समारोप पसायदानाने करण्यात आला. सूत्रसंचालन बबन धनवडे यांनी केले. प्रास्ताविक सुखदेव नागरे यांनी केले. आभार नितीन केने यांनी मानले.

# वाडिया पार्क लेडीज क्लबतर्फे कांदे नवमी उत्साहात

## सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली आषाढ पर्वणी

नगर – वाडिया पार्क लेडीज क्लबतर्फे गायत्री मंदिर, महाजन गल्ली येथे २३ जुलै रोजी कांदे नवमीचा पारंपरिक कार्यक्रम उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. चैत्रगौरी, हळदीकुंकू, कांदे नवमी यांसारखे पारंपरिक सण आजच्या काळात लुप्त होत चालले असले, तरी अशा सणांची परंपरा आणि संस्कृती जपण्याचे कार्य क्लब सातत्याने करत असल्याचा अभिमान यावेळी महिलांनी व्यक्त केला.



आषाढी एकादशीच्या निमित्ताने लेडीज क्लबने पालखी मिरवणुकीत सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत भूषण देशमुख, कुमार सप्तर्षी, वसंत सोमणी आणि सुमन कल्याणपुरकर यांना क्लबच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रास्ताविक सुनीता देव यांनी केले. यावेळी अमृतांजली या नृत्याविष्काराचे सादरीकरण करण्यात आले. अंजली नृत्यालयाच्या संचालिका सुरेखा डावरे यांनी नृत्यांगनांची ओळख करून देत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. नृत्यांगनांनी विठ्ठल स्तुतीवरील नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने गायत्री मंदिर परिसर आकर्षक रांगोळ्या, फुलांची सजावट आणि पालखीने सजविण्यात आला होता. ही सजावट सुनीता देव आणि मीना पाठक यांनी केली. माऊली... माऊली, विठ्ठल... विठ्ठलच्या गजरात सभासदांनी पालखी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेत टाळ, फुगड्या आणि नृत्याचा आनंद लुटला.

यावेळी क्लबच्या सचिव मीना पाठक यांनी आषाढी वारीच्या निमित्ताने अहिल्यानगर ते पंढरपूर हा सायकल प्रवास पूर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमातील खाद्यपदार्थांच्या व्यवस्थेची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. नीलिमा औटी होत्या. त्यांनी उपक्रमाचे कौतुक करून सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्लबच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वसतिगृह येथे आषाढी एकादशीनिमित्त मूकबधिर विद्यार्थ्यांनी बालदिंडी काढली. (छाया : समीर मन्यार)

# बालदिंडीतून मूकबधिर विद्यार्थ्यांना शाळेतच घडले पंढरीचे दर्शन

नगर –वारकरी परंपरेचा आध्यात्मिक वारसा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीची ओळख मूकबधिर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता यावी या उद्देशाने सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वसतिगृह येथे आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या बालदिंडी सोहळ्याने संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला. टाळ–मृदुंगाच्या निनादात, अभंगांच्या सुरात भक्तिमय वातावरणात विद्यार्थ्यांनी शाळेतच पंढरपूर वारीचा अविस्मरणीय अनुभव घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन मधुकर भावले व संस्थेच्या संचालिका विद्या भावले यांच्या हस्ते करण्यात आले. बालदिंडीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विठ्ठल–रुक्मिणी मंदिराला प्रदक्षिणा घातली. त्यानंतर रिंगण, हरिपाठ आणि विठ्ठलनामाचा अखंड गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते दोन विद्यार्थ्यांनी साकारलेले विठ्ठल–रुक्मिणीचे जिवंत रूप. विटेवर उभ्या असलेल्या विठोबा–रुक्मिणीच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी उपस्थितांना साक्षात पंढरपूरच्या दर्शनाची अनुभूती दिली. या भावस्पर्शी सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यालयाचे मुख्याध्यापक डी के जागधने यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# किशोर संस्कृत संवर्धिनी शाळेत चिमुकल्यांची भक्तीमय दिंडी

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या किशोर संस्कृत संवर्धिनी शाळेत भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बाल वारकरी दिंडीमध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून सोडला.



किशोर संस्कृत संवर्धिनी शाळेत आषाढी एकादशीनिमित्त चिमुकल्यांची केलेली पारंपारिक वेशभूषा.

दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल–रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच विविध संत–महात्मे आणि वारकरी यांची आकर्षक व पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि नामस्मरण करत भक्तीचा उत्साह अनुभवला. शाळेच्या मैदानावर पारंपरिक वारकरी पद्धतीने रिंगण सोहळा सादर करण्यात आला. चिमुकल्यांनी उत्स्फूर्तपणे सादर केलेल्या या रिंगण सोहळ्याला उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली. संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी तसेच संस्थेच्या सर्व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. शाळेच्या मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ यांच्या नेतृत्वाखाली दिंडीचे नियोजन करण्यात आले. तसेच सौ. कविता रच्चा, वैशाली दरबेसवार, सौ. आश्विनी कोल्हे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिंडी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक, माध्यमिक व बालक मंदिर विद्यालयातर्फे काढण्यात आलेली बाल वारकऱ्यांची दिंडी.

# बाल वारकऱ्यांच्या दिंडीने दणाणला श्रमिकनगर परिसर

नगर – आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक, माध्यमिक व बालक मंदिर विद्यालयाच्या वतीने भिस्तबाग परिसरात भव्य बाल वारकरी दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात, टाळ–मृदुंगाच्या निनादात, लेझीम आणि ढोल पथकाच्या दणदणाटात निघालेल्या या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. यंदाच्या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे भक्तीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पालकांना रोपांचे वाटप करण्यात आले.

दिंडीची सुरुवात सकाळी नऊ वाजता विद्यालयाच्या प्रांगणात विठ्ठल–रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे विश्वेस्त राजेंद्र म्याना आणि सौ. स्मिता म्याना यांच्या हस्ते करून झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक सब्बन, नगरसेवक मनोज दुलम, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष शंकर येमूल, श्रमिक जनता हौसिंग सोसायटीचे चेअरमन विलास सग्गम, माजी मुख्याध्यापिका विद्या दगडे, सेवानिवृत्त शिक्षिका सौ. भारती गाडेकर, माध्यमिकचे मुख्याध्यापक शशिकांत गोरे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुलभा सुरकुटला तसेच मान्यवर उपस्थित होते.

दिंडीच्या अग्रभागी सजविलेल्या पालखीसमोर विद्यार्थ्यांनी लेझीमचे आकर्षक डाव सादर केले. टाळ, मृदुंग, वीणा आणि भगवे ध्वज हातात घेऊन बाल वारकरी भक्तिगीतांच्या तालावर तल्लीन झाले होते. भिस्तबाग चौक आणि वैदूवाडी मार्गे दिंडीचे मार्गक्रमण झाल्यानंतर पुन्हा विद्यालयाच्या प्रांगणात तिचा समारोप करण्यात आला. संपूर्ण उपक्रम प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक–शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडला.

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाची आषाढी एकादशीनिमित्त दिंडी

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, सारोळा कासार येथे ‘आषाढी वारी दिंडी सोहळा’ अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या दिंडी सोहळ्यातून ज्ञान, सेवा, पर्यावरण, आरोग्य आणि साक्षरता या मूल्यांचा सुंदर संगम पाहावयास मिळाला.




सारोळा कासार येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी काढलेली दिंडी.

सकाळी ठीक ७:३० वाजता सोहळ्यास प्रारंभ झाला. विद्यालयातून निघालेली पालखी शिवप्रेमी चौक, गणपती मंदिर, राधाकृष्ण मंदिर, वेस, पहिले रिंगण, हनुमान मंदिर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दुसरे रिंगण अशा विविध मार्गांवरून जात पुन्हा विद्यालय प्रांगणात आली. तेथे तिसरे रिंगण पार पडल्यानंतर वारकरी विश्रांती आणि शालेय पोषण आहार व पूरक आहार वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध संदेश देणाऱ्या दिंड्यांमध्ये सहभाग घेतला होता. यामध्ये ‘ज्ञानाचा प्रसार, वाचनाचा विस्तार’ सांगणारी ज्ञान दिंडी, ‘वृक्ष लावा, पर्यावरण वाचवा’ असा संदेश देणारी वृक्ष दिंडी, ‘निरोगी शरीर, निरोगी मन’ याचे महत्त्व पटवून देणारी आरोग्य दिंडी, ‘हरी नामाचा गजर’ करणारी भजनी दिंडी, ‘ग्रंथ वाचा, सुशिक्षित समाज घडवा’ असा संदेश देणारी ग्रंथ दिंडी आणि उल्लास नवभारत साक्षरता मोहिमेअंतर्गत व्यापक प्रचार करणारी उल्लास नवभारत साक्षरता दिंडी यांचा समावेश होता. या उपक्रमाचे आयोजन विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक प्रशांत खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या सोहळ्यात विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

# केडगाव येथे रंगला लंडन किड्स प्री स्कूलचा दिंडी सोहळा

नगर – केडगाव येथील ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशन संचलित लंडन किड्स प्री स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक दिंडी सोहळा मोठ्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विठोबा माऊली... ज्ञानराज माऊली तुकाराम...या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.



दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल–रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज, संत मुक्ताबाई, मीराबाई तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत आकर्षक सहभाग नोंदविला. टाळ–मृदुंगाच्या गजरात, भगवे ध्वज हातात घेऊन आणि विठ्ठल नामाच्या गजरात चिमुकले वारकरी उत्साहाने चालत होते. यावेळी बाल वारकऱ्यांनी सादर केलेला रिंगण सोहळा हा दिंडीचा मुख्य आकर्षण ठरला आणि उपस्थितांची मनं जिंकून गेला.

शाळेपासून शाहूनगर बसस्टॉप मार्गे माधवनगर येथील विठ्ठल मंदिरापर्यंत पायी दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, सामाजिक ऐक्य आणि संस्कार यांचा संदेश देणारे फलक हातात घेतले होते. मार्गात ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दिंडीचे स्वागत करून पालखीचे पूजन केले.उमा भोर व राजेंद्र भोर यांच्या हस्ते बाल वारकऱ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल–रुक्मिणी यांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव संदीप भोर, खजिनदार प्रसाद जमदाडे, प्राचार्या रुचिता जमदाडे, प्रमिला लोखंडे, कल्याणी शिंदे, सपना साबळे, जयश्री साठे, जयश्री जठार, काजल व्यवहारे, मनीषा कपाले, अपर्णा गुंजाळ, राणी लाहून्डे, वाळेकर मावशी, गोंदके मावशी, पालक उपस्थित होते.

# ऑनलाइन प्रॉपर्टी शोधताना 'या' चुका टाळा!

## घर शोधा स्मार्टपणे, फसवणूक टाळा खात्रीने! भाग - १

अहिल्यानगरसह राज्यातील अनेक लहान शहरांतील नागरिक रोजगार, व्यवसाय, शिक्षण किंवा गुंतवणुकीच्या उद्देशाने मुंबई, पुणे, नाशिक यांसारख्या शहरांमध्ये घर खरेदी करतात. बहुतेकवेळा घराचा शोध ऑनलाइन प्रॉपर्टी पोर्टल्स, वर्तमानपत्रांतील जाहिराती, प्रॉपर्टी प्रदर्शन (Property Expo) किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून घेतला जातो. मात्र, अशावेळी योग्य पडताळणी न केल्यास आर्थिक आणि कायदेशीर फसवणुकीचा धोका निर्माण होऊ शकतो. अशा फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी घर खरेदी करताना कोणती काळजी घ्यावी, याविषयी माझ्या अनुभव आणि ज्ञानाच्या आधारे हा मार्गदर्शक लेख सादर करत आहे.

**डिजिटल युगातील घरशोध : संधी मोठी, पण सावधगिरी त्याहून महत्त्वाची**

घर खरेदी हा प्रत्येक कुटुंबाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आर्थिक निर्णय असतो. काही वर्षांपूर्वी घर शोधण्यासाठी बिल्डरची कार्यालये, इस्टेट एजंट, वर्तमानपत्रातील जाहिराती किंवा प्रत्यक्ष साइट भेट यांवर अवलंबून राहावे लागत होते. आज मात्र स्मार्टफोन आणि इंटरनेटमुळे काही मिनिटांत शेकडो प्रकल्प, हजारो फ्लॅट्स, विविध किंमती, परिसराची माहिती आणि कर्जाचे पर्याय सहज उपलब्ध होतात.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे घर शोधण्याची प्रक्रिया नक्कीच वेगवान आणि सोपी झाली आहे; पण याच तंत्रज्ञानाचा गैरफायदा घेऊन आर्थिक फसवणूक करणाऱ्यांची संख्या देखील वाढत आहे. आकर्षक छायाचित्रे, बनावट संकेतस्थळे, खोटे एजंट, नकली दस्तऐवज, सोशल मीडियावरील भ्रामक जाहिराती आणि ऑनलाइन पेमेंटची घाई यामुळे अनेक खरेदीदार लाखो रुपयांचे नुकसान करून बसतात.

म्हणूनच ऑनलाइन माहिती ही अंतिम सत्य नसून ती फक्त प्राथमिक माहिती आहे, हे प्रत्येक घर खरेदीदाराने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**तज्ज्ञांचे मत : घर खरेदीत 'विश्वास' नव्हे, 'पडताळणी' महत्त्वाची**

रिअल इस्टेट क्षेत्रात अनेक खरेदीदार भावनिक निर्णय घेतात. आकर्षक जाहिरात, कमी किंमत किंवा शेवटची संधी अशा ऑफरमुळे ते त्वरित आगाऊ रक्कम भरतात. प्रत्यक्षात सुरक्षित व्यवहारासाठी तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत-कागदपत्रांची पडताळणी, RERA नोंदणीची खात्री आणि सर्व आर्थिक व्यवहारांचा अधिकृत पुरावा.

आज AI आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे बनावट फोटो, नकली वेबसाईट आणि खोट्या जाहिराती तयार करणे सोपे झाले आहे. त्यामुळे केवळ ऑनलाइन माहितीवर विसंबून न राहता प्रत्यक्ष पाहणी आणि कायदेशीर सल्ला घेणे हीच सुरक्षित गुंतवणुकीची गुरुकिल्ली आहे.




**आकर्षक जाहिरात म्हणजे विश्वासार्ह प्रकल्पच असे नाही**

अनेक वेळा एखाद्या प्रकल्पाचे फोटो, व्हिडिओ किंवा 3D प्रस्तुतीकरण इतके आकर्षक असते की प्रत्यक्ष प्रकल्पही तसाच असेल, असा समज होतो. परंतु जाहिरात ही विक्रीसाठी तयार केलेली असते; त्यामुळे तिचा उद्देश वास्तव दाखवणे नसून ग्राहकांचे लक्ष वेधणे हा असतो.

म्हणून कोणत्याही जाहिरातीवर विश्वास ठेवण्यापूर्वी पुढील प्रश्न स्वतःला विचारा-

✻ हा प्रकल्प खरोखर अस्तित्वात आहे का?

✻ ही माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे का?

✻ जाहिरात करणारी व्यक्ती अधिकृत प्रतिनिधी आहे का?

✻ दिलेला मोबाईल क्रमांक कंपनीचा आहे की वैयक्तिक?

✻ अशा साध्या पडताळणीमुळे अनेक फसवणुकी टाळता येतात.

**'खूप स्वस्त' म्हणजे नेहमीच 'चांगला व्यवहार' नसतो**

रिअल इस्टेट क्षेत्रात एक नियम कायम लागू पडतो-

बाजारभावापेक्षा असामान्यरीत्या कमी किंमत दिसली तर शंका घ्या.

उदाहरणार्थ, एखाद्या परिसरात दोन बेडरूम फ्लॅटची किंमत साधारण ८० लाख रुपये असताना तोच फ्लॅट ५० लाखांत देण्याची जाहिरात दिसत असेल, तर त्यामागचे कारण समजून घेतल्याशिवाय कोणतीही रक्कम देऊ नका.

अशा जाहिरातींचा उद्देश बहुतेक वेळा ग्राहकांकडून टोकन रक्कम उकळणे किंवा वैयक्तिक माहिती मिळवणे हा असतो.

**सोशल मीडियावरील प्रत्येक प्रॉपर्टी जाहिरात खरीच असेल असे समजू नका**

आज फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, टेलिग्राम यांसारख्या माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रॉपर्टीच्या जाहिराती दिसतात.

यातील काही जाहिराती विश्वासार्ह असतात, तर काही पूर्णपणे बनावट असतात.

विशेषतः खालील बाबी आढळल्यास सावध व्हा-

✻ आजच बुकिंग करा.

✻ फक्त पहिल्या दहा ग्राहकांसाठी.

✻ ऑफर आज रात्रीपर्यंतच.

✻ आधी पैसे पाठवा, नंतर साइट दाखवतो.

अशा प्रकारचा मानसिक दबाव निर्माण करणे हे फसवणूक करणाऱ्यांचे सामान्य तंत्र आहे.

AI मुळे फसवणूक अधिक विश्वासार्ह दिसू लागली आहे

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) मुळे आता काही मिनिटांत अतिशय आकर्षक इमारतींची चित्रे तयार करता येतात.

काही वेळा प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या प्रकल्पांचे फोटोदेखील इतके वास्तववादी असतात की अनुभवी व्यक्तीलाही फरक ओळखणे कठीण जाते.

याशिवाय-

✻ AI Voice वापरून बनावट फोन कॉल

✻ Deepfake व्हिडिओ

✻ नकली ग्राहक प्रतिक्रिया (Fake Reviews)

संगणकाद्वारे तयार केलेले प्रशंसापत्र यांचाही वापर वाढत आहे. त्यामुळे फोटोपेक्षा कागदपत्रांवर विश्वास ठेवा.

**प्रॉपर्टी पोर्टल म्हणजे माहितीचा स्रोत; अंतिम निर्णयाचे ठिकाण नाही**

प्रॉपर्टी पोर्टल्स माहिती शोधण्यासाठी उपयुक्त असतात. मात्र त्यावर दिसणाऱ्या प्रत्येक माहितीची स्वतंत्र पडताळणी करणे आवश्यक आहे.

विशेषतः खालील बाबी तपासा-

✻ प्रकल्पाचा अचूक पत्ता

✻ विकासकाचे नाव

✻ बांधकामाची सद्यस्थिती

✻ ताबा देण्याची अपेक्षित तारीख

✻ कायदेशीर परवानग्या

अधिकृत संपर्क क्रमांक

यामुळे चुकीची किंवा अपूर्ण माहितीमुळे होणारे नुकसान टाळता येते.

**(क्रमशः - भाग २ मध्ये)**

पुढील भागात आपण पाहणार आहोत-

✻ RERA पडताळणी

✻ MahaRERA मधील काही महत्त्वाचे तत्त्वे

✻ ऑनलाइन पेमेंट करताना घ्यायची खबरदारी

✻ QR Code, UPI आणि Escrow Account

✻ कागदपत्रांची संपूर्ण चेकलिस्ट

✻ Cyber Fraud झाल्यास त्वरित काय करावे

✻ सुरक्षित घरखरेदीसाठी १० सुवर्ण नियम.

**- इंजि. प्रकाश जैन**
**सिव्हिल इंजिनिअर,** RERA **व**
Re-Development Consultant
**१९९० पासून बिल्डर व डेव्हलपर म्हणून कार्यरत. रिअल इस्टेट,** RERA **आणि पुनर्विकास क्षेत्रातील ३० + वर्षांचा अनुभव.**
**आदर्श कन्सल्टन्सी**
O-1, **आदर्श समृद्धी अपार्टमेंट, चौपाटी कारंजा, अहिल्यानगर.**
**मो.९४२२२२०७६२, ८९७५११२३४५**



AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# आषाढी एकादशीनिमित्त वसंत टेकडी येथील श्री नाथ विद्या मंदिरात पारंपरिक दिंडी सोहळा

नगर - वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री. नाथ विद्या मंदिरातील बालकांनी आषाढी एकादशीनिमित्त परिसरात पारंपरिक दिंडी सोहळा आयोजित केला होता. विठ्ठल नामाच्या अखंड गजराने परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्रांगणात पालखी पूजनाने झाली. पालक एमआयडीसीचे पोलीस स्टेशनचे कर्मचारी अनिल उगलमुगले, सौ. सीमा उगलमुगले यांच्या हस्ते विधिवत पालखी पूजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एन.जी.सब्बन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखी पूजनानंतर ज्ञानोबा-तुकाराम, पांडुरंग हरी, जय जय रामकृष्ण हरी या जयघोषात दिंडीला प्रारंभ झाला.

यानंतर शाळेच्या प्रांगणात पारंपरिक रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी लेझीमचे आकर्षक सादरीकरण, पारंपरिक नृत्य आणि वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर दिंडीची वाटचाल शिवनगर येथील सिद्धेश्वर मंदिराकडे करण्यात आली.

नागरिकांनी दिंडीचे दर्शन घेत भक्तिभावाने स्वागत केले. सिद्धेश्वर मंदिराचे व्यवस्थापक नांगरे, अनिल काळे, महेंद्र पांडे, अण्णा धामणे आणि बाळासाहेब आंधळे यांनी दिंडीचे स्वागत केले.

या संपूर्ण दिंडी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एस.जी.सब्बन सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



वसंत टेकडी येथील श्रीनाथ विद्या मंदिरातील चिमुकल्यांनी आषाढी एकादशी निमित्त देव देवतांची वेशभूषा करून दिंडी सोहळा साजरा केला. (छाया - विजय मते)



पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारी ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी बालदिंडी.

# ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी बालदिंडीतून दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या केडगाव येथील प्रथम आय. एस.ओ.मानांकन प्राप्त ओंकारनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त केडगाव परिसरातून बालदिंडी काढून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. वृक्ष जगवा जीवन फुलवा, झाडांचे रक्षण आपले संरक्षण, हम सब का एक ही नारा साफ सुथरा देश हमारा, भारताने दिला मान स्त्री पुरुष एकसमान, मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण, दुर्गंधीचा घाला आळा पर्यावरणाचा ह्रास टाळा, स्वच्छता असे जेथे आरोग्य वसे तेथे असे फलक हाती घेत विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृती केली.

ज्ञानोबा माऊली तुकाराम अशा जयघोषात या बालदिंडीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.विठ्ठलाच्या भक्तीगीतावर शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या लेझीम नृत्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शाहूनगर बसस्थानक येथे विद्यार्थ्यांनी उभे रिंगण करत विविध अभंगांचे सादरीकरण केले. तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी फुगडी खेळण्याचा आनंद घेतला. लेझीम पथकाने विविध नृत्याचे सादरीकरण केले.त्यामुळे सर्व परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला.

त्यानंतर या बालदिंडीने माधवनगर येथील विठ्ठल रुख्मिणी मंदिरात जाऊन विठ्ठल रुख्मिणीचे दर्शन घेतले. माधवनगर येथील नागरिकांनी या बालदिंडीचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. तेथे विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला.

बालदिंडीमध्ये मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा पल्लवी भुजबळ, उपाध्यक्षा दुर्गा घेवारे, सदस्य दिपाली साळवे, पुनम बडे, कविता वर्तले, कमल पाखरे, पुजा नेटके, कांताबाई तोडमल, सागर घेवारे, अंगणवाडी सेविका रोहिणी दळवी, शुभांगी बेरड, भारती आहुजा यांनी सहभाग घेतला. श्रीराम टी सेंटर शाहुनगर, कांताबाई तोडमल यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला.

# बालक मंदिर महिला मंडळ शाळेची आषाढी एकादशीनिमित्त पर्यावरण दिंडी

नगर - दिल्लीगेट येथील बालक मंदिर महिला मंडळ शाळेने आषाढी एकादशी निमित्त पर्यावरण दिंडी, निर्मल वारी, स्वच्छता दिंडीचे आयोजन केले होते. दिल्लीगेट येथील बालक मंदिर महिला मंडळ शाळेपासून खाकीदास बाबा मठापर्यंत दिंडी काढली. शाळेत दिंडी पूजन व औक्षणासाठी सौ. रोहिणीताई पुंडलिक व सौ नीलमताई ढोरे यांच्या हस्ते करण्यात आले सर्व शिक्षिकांनी या स्वच्छता व पर्यावरण दिंडीचे पूजन करून विद्यार्थ्यांसह निसर्ग संवर्धनासाठी संकल्प केला.



बालक मंदिर महिला मंडळ शाळेच्या आषाढी एकादशी निमित्त पर्यावरण दिंडीत सहभागी झालेले विद्यार्थी.

विद्यार्थ्यांनी पर्यावरणासंबंधी उत्कृष्ट घोषवाक्ये धरलेले फलक उंच धरून परिसरात या दिंडीद्वारे जागृती निर्माण केली. यानंतर खाकीदास बाबा मठात विद्यार्थ्यांनी रिंगण केले. यात विशेष आकर्षण म्हणजे भागवत संप्रदायाची ध्वजा हातात धरलेला वारकरी अश्वावर आरूढ होऊन ३ प्रदक्षिणा पूर्ण केल्या. मुलामुलींनी वारकऱ्यांचा वेश परिधान करून हातात टाळ घेतले होते. छोट्या मुलींनी डोक्यावर तुळस घेऊन विठ्ठल नामाचा गजर केला. तसेच मुलांनी भगवी पताका खांद्यावर घेऊन दिंडीत सहभाग घेतला. फुलांनी सजवलेल्या पालखीत विठ्ठल रखुमाईची मूर्ती ठेवली होती. तुला साद आली.

या विठ्ठल भक्तीगीतावर सर्व विद्यार्थी वारकऱ्यांनी रिंगणात सुंदर नृत्य सादर केले. महिला मंडळ शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी बाल वारकऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी श्री. मिश्रा आणि श्री हासे गुरुजींतर्फे विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला. या दिंडी सोहळ्यासाठी बालक मंदिर महिला मंडळ शाळेच्या सर्व शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले.



समर्थ प्रशालेच्या प्रांगणात भक्तिमय वातावरणात रंगलेला बालदिंडी सोहळा.

# समर्थ प्रशालेच्या प्रांगणात भक्तिमय वातावरणात रंगला बालदिंडी सोहळा

नगर - समर्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला (प्राथमिक विभाग) यांच्या प्रांगणात आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडी सोहळा उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. गुंफेकर यांनी वारकरी संप्रदायाची महान परंपरा, संतांची शिकवण आणि बालदिंडीमागील संस्कारमूल्ये यांचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, भक्ती, एकोपा आणि संस्कृतीची जपणूक व्हावी, या उद्देशाने बालदिंडीचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

वारकरी वेशभूषेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंग, भगव्या पताका आणि विठ्ठल नामाच्या गजरात बालदिंडी काढत संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्यानंतर सामूहिक विठ्ठल आरती झाल्याने वातावरण अधिकच भक्तिमय झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी तथा श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचे शालेय समितीचे चेअरमन सुरेश क्षीरसागर होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी संतपरंपरेतील संस्कार मुलांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले आणि पालकांनीही मुलांसोबत संस्कारमय परंपरा जपण्याचे आवाहन केले.

यावेळी इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुंदर भक्तिमय नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. दिंडी व रिंगण सोहळ्यात विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अंजली देशपांडे यांनी केले, तर सौ. सुप्रिया डबीर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात

नगर - सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल तारकपूर येथे आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन, आरती आणि दिंडीने झाली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकारामचा जयघोष करत संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून टाकला.




सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त काढण्यात आलेली दिंडी.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पाणी अडवा, पाणी जिरवा - पाणी वाचवा या सामाजिक संदेशावर आधारित प्रभावी भारूड सादर केले. या सादरीकरणातून पाण्याचे महत्त्व, वाढती पाणीटंचाई आणि पाणी जपून वापरण्याची गरज याबाबत जनजागृती करण्यात आली. उपस्थित पालक व मान्यवरांनी या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरलेले विठ्ठल भक्त कुर्मदास या विषयावरील लघुनाट्य विद्यार्थ्यांनी अत्यंत भावपूर्ण पद्धतीने सादर केले. यावेळी पूर्व प्राथमिक विभागातील चिमुकल्यांनी विठ्ठलभक्तीवर आधारित भक्तिगीत सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले, तर हायस्कूल विभागातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक लेझीमचे दमदार सादरीकरण करून कार्यक्रमात उत्साह आणि जोश निर्माण केला. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सौ. प्रीती कटारिया, सौ. आशा रंगलानी, सौ. करिश्मा नवलानी, सौ. भावना भालेराव तसेच इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी केले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राम मेघांनी, विश्वस्त सुरेश हिरानंदानी, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, राजकुमार गुरुनानी, हरेष मध्यान तसेच माध्यमिक विभागाच्या प्राचार्या गीता तांबे, पूर्व प्राथमिक व प्राथमिक च्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सुंदर अशी फलक सजावट मनिष लांडे व प्रांगण सजावट माधमिकच्या विद्यार्थ्यांनी केली.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# ज्ञानबा-तुकारामच्या जयघोषाने लाल टाकी परिसर दुमदुमला

नगर - आषाढी एकादशीनिमित्त लाल टाकी येथील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत आयोजित करण्यात आलेल्या दिंडी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. ज्ञानबा-तुकाराम... पांडुरंग हरी... विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या अखंड नामघोषाने वातावरण भारावून गेले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनीता शेवाळे यांच्या हस्ते भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीला प्रारंभ झाला. दिंडीतील



विद्यार्थ्यांची पारंपरिक वेशभूषा विशेष आकर्षण ठरली.

विद्यार्थ्यांच्या मुखी अखंड हरिनाम, हातात टाळ-मृदुंग आणि अभंगांच्या गजरात शाळेच्या प्रांगणात पारंपरिक गोल रिंगण साकारण्यात आले. या रिंगणाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. भक्ती, समता, संस्कार आणि वारकरी परंपरेचे प्रभावी दर्शन या उपक्रमातून घडले.

शाळेच्या पूर्व प्राथमिक (बालवाडी) विभागातही बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुंदर रिंगण साकारत संपूर्ण परिसर दिंडीमय केला. याप्रसंगी शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. अर्चना गिरी, बालवाडी विभाग प्रमुख सौ. लता मोढवे, बालवाडी विभागातील शिक्षिका उपस्थित होत्या.




## लाभ रोझमेरीच्या तेलाचे



आयुर्वेद आणि विकार

रोझमेरीचं तेल खूप उपयुक्त असतं. केस, त्वचेच्या आरोग्यासोबतच आपल्या सर्वांगिण आरोग्यासाठीही हे तेल उपयुक्त ठरू शकतं. या तेलाच्या उपयोगांविषयी...

* केसांच्या समस्या दूर करण्यासोबतच त्यांच्या वाढीसाठी ५० मिलीलीटर ॲप्रिकॉट किंवा ऑलिव्ह ऑईलमध्ये रोझमेरी तेलाचे ३० थेंब टाका. हे मिश्रण केस आणि स्काल्पला लावा. हे तेल रात्री लावल्यामुळे बरेच लाभ होऊ शकतील. या तेलामुळे कोंडा तसंच केसांच्या इतर समस्या दूर होऊ शकतील.

* पोटाच्या तक्रारी दूर करण्यासाठी ५० मिलीलीटर तिळाच्या तेलात रोझमेरी तेलाचे ३० थेंब टाका. झटपट आरामासाठी या मिश्रणाने पोटाच्या खालच्या भागावर मसाज करा.

* सर्दी–खोकल्यापासून आराम मिळवण्यासाठीही हे तेल उपयुक्त ठरतं. एका भांड्यात थोडं पाणी गरम करून घ्या. त्यात रोझमेरी तेलाचे चार ते पाच थेंब टाका. आता डोक्यावरून टॉवेल घेऊन या पाण्याची वाफ घ्या. तुम्हाला बरं वाटेल.

* डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूंचं दुखणं, शारीरिक दुखणं तसंच मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी ५० मिलीलीटर तिळाच्या तेलात रोझमेरी तेलाचे २५ थेंब टाका आणि या मिश्रणाने वेदना होणाऱ्या भागाला मसाज करा. तुम्हाला आराम मिळेल.

रोझमेरी किंवा इतर तेलांचा वापर करण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या. कोणतंही सुगंधी तेल गुणकारी तेल नसतं हे लक्षात ठेवा.

## धोका हायटल हर्नियाचा

हायटल हर्नियामध्ये पोटाचा काही भाग अन्ननलिकेच्या समोरील बाजूला छातीतमध्ये ढकलला जातो. यात पोटाचा भाग छातीच्या पिंजऱ्यातून डायाफ्रामच्या माध्यमातून निघतो. वाढत्या वयानुसार हायटल हर्निया होण्याची शक्यता वाढते. ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ५५ ते ६० टक्के व्यक्ती हायटस हर्नियाने ग्रस्त असल्याचे दिसून येते. यापैकी नऊ ते दहा टक्के व्यक्तींमध्ये याची लक्षणे आढळून येतात.

हायटल हर्निया जन्मापासून असतो किंवा वाढत्या वयात उद्भवू शकतो. पोटात दाब निर्माण झाल्यामुळेही या प्रकारचा हर्निया होऊ शकतो. लठ्ठपणा, गर्भधारणा, दीर्घकालीन बद्धकोष्ठता, सीओपीडी, आघात, शस्त्रक्रिया आणि अनुवंशिकता यासारखे इतर घटकदेखील त्यासाठी कारणीभूत ठरतात. याचे मुख्य कारण म्हणजे स्नायू कमकुवत होणे.


**कशामुळे होतो हायटस हार्निया?**

हायटल हर्नियामध्ये पोटाचा वरचा भाग 'डायफ्रामॅटिक ओपनिंग'मधून छातीत ढकलतो. त्यामुळे अन्ननलिकेच्या खालच्या टोकावरील स्नायूंच्या झडपेला धोका निर्माण होतो. झडप सैल आणि शिथिल झाल्यामुळे पोटातील घटक आणि आम्ल अन्ननलिकेत जाऊ शकते. त्यामुळे 'गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स' हा रोग होतो. हायटल हर्नियाच्या सुरूवातीच्या टप्प्यात बहुतेकदा त्याची लक्षणे आढळून येत नाहीत आणि सामान्यतः औषधांनी त्यावर उपचार केले जातात. पुढच्या टप्प्यात मात्र त्यावर लॅपरोस्कोपिक फंडोप्लिकेशनच्या स्वरूपात शस्त्रक्रिया करावी लागते.

**लक्षणे कोणती?**

हायटल हर्नियाच्याची सुरूवातीला कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. मात्र विकार वाढल्यावर खालील लक्षणे आढळतात.

* ढेकर येणे, उलट्या होणे
* छातीत जळजळ आणि ॲसिड रिफ्लक्स
* पोट किंवा छातीत दुखणे
* गिळण्यास त्रास होणे
* खूप पोट भरल्यासारखे वाटणे, विशेषतः जेवणानंतर
* काळ्या रंगाचा मल येणे किंवा रक्ताच्या उलट्या होणे, हे कधीकधी गॅस्ट्रोइंटेस्टाइनल ट्रॅक्टचे लक्षण असते.
* जुनाट खोकला आणि दम्यासारखी लक्षणे.
* आवाजात बदल होणे




व्याधी विकार

**डॉ. दिलीप शिरसाट**

**उपचार काय?**

जीवनशैलीत बदल हा उपचारांचा पहिला टप्पा आहे. बहुतेक हायटल हर्नियाची लक्षणे ही ॲसिड रिफ्लक्समुळे उद्भवत असल्याने, आहारातील बदल या समस्येत लक्षणीयरीत्या मदत करू शकतात. एकाच वेळी पोटभर न जेवता ठराविक अंतराने थोडे थोडे खाणे योग्य राहील. झोपण्यापूर्वी भरपेट आहार किंवा नाश्ता करणे टाळा. धूम्रपानाची सवय सोडणे हादेखील एक प्रभावी मार्ग आहे. छातीतील जळजळ टाळण्यासाठी जेवणानंतर लगेच झोपणे किंवा वाकणे टाळा. हायटल हर्नियाच्या उपचारांमध्ये औषधे महत्त्वाची भूमिका बजावतात. विशेषतः ॲसिड रिफ्लक्सशी संबंधित लक्षणे आढळल्यास याची मदत होते. अँटासिड्स सामान्यतः पोटातील ॲसिड निष्क्रिय करण्यासाठी वापरले जातात, तर एच२–रिसेप्टर ब्लॉकर्स हे ॲसिड उत्पादन कमी करण्यास मदत करतात. प्रोटॉन पंप इनहिबिटर (पीपीआय) हा आणखी एक प्रभावी पर्याय आहे, कारण ते ॲसिड उत्पादन पूर्णपणे रोखतात. त्यामुळे अन्ननलिकेचे कार्य सुरळीत राखता येते.

**शस्त्रक्रियेचा सल्ला कधी दिला जातो?**

रुग्णाला औषधे घेऊनही आराम मिळत नाही किंवा अन्ननलिकेतील अल्सर, श्वासनलिकेतील रिफ्लक्स, बॅरेट्स एसोफेगस आदींमध्ये गुंतागुंत निर्माण होते तेव्हा शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. अशा प्रकरणांमध्ये लॅप्रोस्कोपिक फंडोप्लिकेशन ही शस्त्रक्रिया केली जाते. ती त्यातल्या त्यात सर्वात सौम्य शस्क्रिक्रया मानला जाते. या शस्त्रक्रियेमुळे लक्षणे कमी होतात आणि भविष्यातील गुंतागुंतीदेखील टाळता येतात. फंडोप्लिकेशनमध्ये छातीतून हर्निएटेड घटक पोटात परत आणणे, सैल झालेली झडप घट्ट करणे आणि पोटाचे आवरण तयार करणे यांचा समावेश होतो. या प्रक्रियेत रुग्णांना कमी वेदना होतात. रुग्ण लवकर बरा होतो आणि शस्त्रक्रियेनंतर २४ ते ४८ तासांत त्यांना घरी सोडले जाते.

## सततच्या सर्दीकडे दुर्लक्ष नको



आरोग्य विशेष

**डॉ. कुंदन गायकवाड**

दर महिन्याला सर्दी, खोकला आणि फ्लू होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. दरवेळी नाकातून पाणी येणे, घसा खवखवणे आणि शिंका येणे हा केवळ हवामानाचाच परिणाम असेल असे नाही. वारंवार येणारी सर्दी हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षणदेखील असू शकते.

हवामान बदलल्यावर सर्दी होणे सामान्य आहे. परंतु दर काही आठवड्यांनी नाकातून पाणी येऊ लागले, घसा दुखू लागला किंवा शिंका येणे थांबले नाही तर प्रकरण गंभीर असू शकते. याचं सर्वात सामान्य कारण म्हणजे कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती. शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत झाली तर ती विषाणू आणि जीवाणुंशी लढण्यास असमर्थ असते. त्यामुळे वारंवार सर्दी होऊ शकते. खाण्याच्या वाईट सवयी, झोपेचा अभाव, ताणतणाव आणि व्यायामाचा अभाव ही याची मुख्य कारणे आहेत. बऱ्याच लोकांना धूळ, धूर, परागकण, पाळीव प्राण्यांचे केस किंवा कोणत्याही अन्नपदार्थांची ॲलर्जी असते. ॲलर्जीमुळे वारंवार सर्दीसारखी लक्षणे देखील उद्भवतात.

थंडीसोबत डोकेदुखी, जडपणा आणि चेहऱ्यावर दाब जाणवत असेल तर ते सायनस इन्फेक्शन असू शकते. त्यात नाकाच्या हाडांभोवती असलेली सायनस पोकळी सुजते. थंडीमध्ये वारंवार श्वास घेण्यास त्रास होत असेल तर ते दम्याचे लक्षण असू शकते. बेचदा लोक ती किरकोळ सर्दी आहे, असे समजून त्याकडे दुर्लक्ष करतात; परंतु उपचार न केल्यास परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. सर्दी झाल्यावर प्रत्येक वेळी अँटीबायोटिक्स घेण्याच्या सवयीमुळे रोगप्रतिकारशक्तीदेखील कमकुवत होऊ शकते. यामुळे आजार सहजपणे पकडू लागतात.


## हिप फ्रॅक्चर महिलांमध्ये अधिक

पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हिप फ्रॅक्चरचे प्रमाण अधिक आहे. हा वाढलेला धोका मुख्यत्वे हार्मोन्समधील बदलांमुळे होतो. महिलांमध्ये हाडांची घनता कमी झाल्यामुळे हा धोका पहायला मिळतो. रजोनिवृत्तीनंतर इस्ट्रोजेन पातळीमध्ये अचानक घट झाल्यामुळे हाडांचे नुकसान होते, हाडांची रचना कमकुवत होते आणि हाडे तुटण्याची शक्यता वाढते, म्हणूनच, ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांनी हाडांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य खबरदारी घेणे आवश्यक आहे.

हिप फ्रॅक्चर हे बहुतेकदा हाडांमधील कमकुवतपणा, पडल्यामुळे किंवा किरकोळ दुखापतीमुळे होते. हिप फ्रॅक्चर झालेल्या व्यक्तीला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते. लक्षणांमध्ये मांडीला अचानक वेदना होणे, पायावरील भार सहन न होणे, स्नायुंमधील ताठरता, जखम होणे आणि हाडांची घनता कमी होणे यांचा समावेश आहे. रजोनिवृत्तीनंतर महिलांमध्ये हे फ्रॅक्चर हे सामान्यतः इस्ट्रोजेनच्या कमतरतेमुळे होऊ शकते. इस्ट्रोजेनची पातळी कमी झाल्यामुळे हाडे कमकुवत होतात. महिलांमध्ये नैसर्गिकरित्या पुरुषांपेक्षा हाडांची घनता कमी असते. त्यामुळे त्यांची हाडे अधिक नाजूक होतात आणि वयानुसार फ्रॅक्चर होण्याची शक्यता वाढते.

**शस्त्रक्रियेचा पर्याय किती गरजेचा?**

सुमारे वीस टक्के महिलांना रजोनिवृत्तीनंतर हिप फ्रॅक्चरचा धोका असतो. गेल्या दोन महिन्यांत, ५५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या २ ते ३ महिलांनी हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया केली आहे. उपचारांमध्ये शस्त्रक्रिया, त्यानंतर पुनर्वसन, फिजिओथेरपीचा समावेश आहे. सध्या संपूर्ण हिप रिप्लेसमेंटसाठी सुपरपॅथ हे प्रगत तंत्रज्ञान वापरले जाते. ही एक लहान छिद्र पाडून केली जाणारी प्रक्रिया असून यामध्ये स्नायू आणि ऊतींचे नुकसान कमी होते. त्यामुळे जलद रिकव्हरी, कमीत कमी वेदना आणि रुग्णालयात राहण्याचा कालावधी कमी होतो.



जाणून घ्या

**डॉ. मेघा दळे**

या पद्धतीमुळे शस्त्रक्रियेनंतर हिप डिस्लोकेशन आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी होते. स्नायू आणि स्नायुबंध (लिगामेंट्स) यांना इजा न झाल्याने हे तंत्र अधिक नैसर्गिकरित्या सांध्यांची हालचाल करण्यास मदत करते. त्यामुळे दीर्घकालीन परिणाम सुधारतात. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण स्वतंत्रपणे चालणे आणि मांडी घालून बसणे यासारख्या सामान्य क्रियादेखील करू शकतात.


**प्रतिबंधक उपाय**

प्रतिबंध हा सर्वोत्तम मार्ग असून आहारात कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीचा समावेश करणे, नियमित व्यायाम करणे, धूम्रपान आणि मद्यपानाचे व्यसन टाळणे आणि वयानुसार हाडांची घनता तपासून घेणे गरजेचे आहे. रजोनिवृत्तीनंतर महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने हाडांना बळकटी देणारी औषधे घ्यायला हवीत.

## तरुण वयातही वाढत आहे संधीवात

संधिवात हा केवळ वयोवृद्धांमध्ये होणारा आजार आहे, असा गैरसमज समाजात आढळून येतो. सध्या २०, ३० आणि ४० या वयोगटातील तरुणांमध्येही संधिवाताचे प्रमाण वाढताना दिसत आहे. सांध्यांमध्ये होणारी सूज, वेदना, स्नायूंचा कडकपणा आणि हालचालींमध्ये अडथळा यामुळे दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सुरुवातीच्या लक्षणे ओळखून वेळीच उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे. संधीवातामुळे सांध्यांमध्ये दाह (इन्फ्लेमेशन) निर्माण होतो. त्यामुळे वेदना, सूज, कडकपणा आणि सांध्यांची हालचालींवर मर्यादा येऊ शकतात. भारतात संधिवाताच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून, त्यात तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. व्यायामाचा अभाव, पूर्वी झालेल्या सांध्यांच्या दुखापती, स्वयंप्रतिकार (ऑटोइम्यून) विकार, आनुवंशिकता तसेच चुकीची जीवनशैली यांसारख्या कारणांमुळे कमी वयातही संधिवाताचा धोका वाढतो. सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास सांध्यांचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते.

आरोग्यमंत्र



लक्षणे – अनेक आठवड्यांपासून होणारी सततची सांधेदुखी *सकाळी उठल्यानंतर तीस मिनिटांपेक्षा जास्त काळ सांध्यांमध्ये कडकपणा जाणवणे *सांध्यांभोवती सूज किंवा स्पर्श केल्यावर वेदना होणे *वाकणे, चालणे, जिने चढणे किंवा हातांचा वापर करताना अडचणी येणे *विश्रांतीनंतर किंवा शारीरिक हालचालींनंतर वेदना वाढणे *सांध्यांची हालचाल करताना कटकट किंवा घर्षणासारखा आवाज किंवा संवेदना जाणवणे *सतत थकवा किंवा ऊर्जा कमी झाल्याचे जाणवणे *हातांची बोटे, मनगट, पाय किंवा गुडघ्यांमधील सांधे वारंवार दुखणे ज्यांच्या कुटुंबात संधिवाताचा इतिहास आहे, लठ्ठपणा आहे, इतर कारणांनी सांध्यांना दुखापत झाली आहे, स्वयंप्रतिकार विकार आहेत.

## लठ्ठपणा वाढवतो कर्करोगाचा धोका



जीवनशैली

आजकालची बैठी जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे लठ्ठपणा ही एक जागतिक समस्या बनली आहे. अनेकदा आपण वजन वाढण्याकडे फक्त 'लूक' किंवा 'फिटनेस'च्या दृष्टीने पाहतो; पण नुकत्याच समोर आलेल्या एका संशोधनाने सर्वांचेच डोळे उघडले आहेत. लठ्ठपणा हा फक्त शरीराचा आकार बदलत नाही, तर तो १९ प्रकारच्या कर्करोगांचा धोका लक्षणीयरीत्या वाढवू शकतो, असा धक्कादायक खुलासा एका नव्या संशोधनातून झाला आहे. त्यामुळे निरोगी वजन राखणे हे आता केवळ सुंदर दिसण्यासाठी नाही, तर जीवघेण्या आजारांपासून स्वतःला वाचवण्यासाठी अत्यंत गरजेचे झाले आहे. 'नेचर मेटॅबॉलिझम' या जगप्रसिद्ध वैज्ञानिक नियतकालिकात हे संशोधन प्रकाशित झाले आहे. या अभ्यासाचे गांभीर्य यावरून लक्षात येते, की यामध्ये तब्बल १५ लाखांहून जास्त कर्करोग रुग्णांच्या आरोग्यविषयक माहितीचे सखोल विश्लेषण करण्यात आले. या संशोधनात आधीपासून माहित असलेल्या कर्करोगांशिवाय, काही नवीन प्रकारच्या कॅन्सरचा थेट संबंध लठ्ठपणाशी असल्याचे सिद्ध झाले आहे. **१९ प्रकारच्या कर्करोगांचा समावेश**

* रक्ताचा कर्करोग: ल्युकेमिया आणि 'नॉन–हॉजकिन लिम्फोमा' * पोटाचे विकार: कोलोरेक्टल (आतड्याचा) कर्करोग * महिलांचे आजार: रजोनिवृत्तीनंतरचा स्तनाचा कर्करोग आणि अंडाशयाचा कर्करोग * इतर गंभीर प्रकार: मूत्राशयाचा कर्करोग आणि ग्लिओमा (मेंदूचा एक प्रकारचा कर्करोग) तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, शरीरात अतिरिक्त चरबी जमा होते तेव्हा ती फक्त पोटावर किंवा मांड्यांवर दिसत नाही, तर ती शरीराच्या आत अनेक घातक रासायनिक बदल घडवून आणते.


## लहान वयातच मोतीबिंदू!



आरोग्य वेध

आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाच्या माहितीनुसार, भारतात सध्या १०१ दशलक्षाहून अधिक प्रौढ व्यक्ती मधुमेहाने ग्रस्त आहेत आणि १३६ दशलक्ष व्यक्तींना मधुमेहाची पूर्वस्थिती आहे आणि येत्या काही वर्षांत या संख्येत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. मधुमेहाशी संबंधित डोळ्यांच्या अधिक परिचित गुंतागुंतींपैकी एक म्हणजे 'डायबेटिक रेटिनोपॅथी' असली, तरी तज्ज्ञांच्या मते मोतीबिंदू हीदेखील एक मोठी चिंता बनत आहे. दीर्घकाळापासून मधुमेह असणाऱ्या किंवा मधुमेह नियंत्रणात नसणाऱ्या व्यक्तिंमध्ये रक्तातील साखरेची पातळी दीर्घकाळ वाढल्यास डोळ्यांच्या नैसर्गिक भिंगावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कमी वयातच भिंग धूसर होण्याची प्रक्रिया वेगवान होते आणि दृष्टीची स्पष्टता कमी होते. मोतीबिंदूकडे आता केवळ वयाशी संबंधित आजार म्हणून पाहता येणार नाही. मधुमेह, लठ्ठपणा आणि उच्च रक्तदाब यासारखे चयापचय विकार वाढत असल्यामुळे, कमी वयात मोतीबिंदू होण्याचा आणि तो अधिक वेगाने वाढण्याचा धोकाही वाढत आहे. यामुळे टाळता येण्याजोगी दृष्टीहानी रोखण्यासाठी नियमित डोळ्यांची तपासणी आणि चयापचय क्रियेवर उत्तम नियंत्रण ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. मधुमेह हा अकाली मोतीबिंदू होण्यामागचे एक प्रमुख कारण असल्याचे अधिकाधिक मान्य केले जात आहे. चाळीशी आणि पन्नाशीतील रुग्णांमध्ये, विशेषतः रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात नसणाऱ्यांमध्ये मोतीबिंदूचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे.

## वारंवार चक्कर येते?




जाणून घ्या

वातावरणात सतत बदल होत आहेत. त्याचे परिणाम आपल्या आरोग्यावर होतात. आरोग्याकडे ते कधीच लक्ष देत नाही. हे पुढे जाऊन धोक्याचे ठरू शकते. अनेक लोक सामान्य थकवा, हवामानातील बदल किंवा तणावामुळे येणाऱ्या वारंवार चक्कर येण्याकडे दुर्लक्ष करतात; पण ही समस्या वाटते तितकी सोपी नाही. कधीकधी हे शरीरातील आवश्यक जीवनसत्त्वांच्या कमतरतेचे लक्षण असू शकते; पण चक्कर येण्याचे एकमेव कारण जीवनसत्त्वांची कमतरता नाही. कमी रक्तदाब, ॲनिमिया, शरीरातील पाण्याची कमतरता आणि आरोग्य समस्यांमुळेही चक्कर येऊ शकते. व्हिटॅमिन बी१२, फोलेट (व्हिटॅमिन बी९) आणि व्हिटॅमिन डी यांच्या कमतरतेमुळे चक्कर येऊ शकते. लाल रक्तपेशींच्या निर्मितीसाठी व्हिटॅमिन बी१२ आणि फोलेट आवश्यक असतात. यांच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होऊ शकतो. त्यामुळे मेंदू आणि शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळत नसल्याने चक्कर येणे, अशक्तपणा आणि थकवा जाणवू शकतो. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे स्नायू कमकुवत होऊ शकतात आणि तोल जाऊ शकतो. काहींना चक्कर किंवा अस्थिरता जाणवते. अशक्तपणा, थकवा जाणवत असेल तर, तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या. श्वास लागणे, अंधुक दृष्टी, हात आणि पायांना मुंग्या येणे, चालण्यात अडचण, बेशुद्ध होणे, तीव्र डोकेदुखी किंवा छातीत दुखणे यांसारख्या समस्या असतील तर डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या आहारात बदल करा. वारंवार चक्कर येत असेल, तर स्वतःहून औषधोपचार करू नका किंवा व्हिटॅमिन सप्लिमेंट्स घेऊ नका.

नवसंशोधन

### लाळेची किफायतशीर चाचणी



कर्करोगाच्या निदानाची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आणि खर्चिक असते. पण शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांमुळे कर्करोगाचं निदान किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीने होऊ शकतं. या अत्यंत किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीमुळे ह्युमन पॅपिलोमा १६ विषाणूचं निदान करता येतं. हा विषाणू घसा, तोंडाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतो. या चाचणीमुळे तोंडाच्या तसंच घशाच्या कॅन्सरचं वेळेत निदान होऊ शकतं. अमेरिकेतल्या ड्यूक विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. हे तंत्रज्ञान इतर काही विकारांच्या निदानासाठी उपयुक्त ठरू शकतं, असंही शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

दंतारोग्य

### ओव्याने दूर करा तोंडाच्या समस्या



हिरड्या सुजणं, तोंडाची दुर्गंधी या मौखिक आरोग्याशी संबंधित सर्वसाधारण समस्या आहेत. तोंड स्वच्छ ठेवलं नाही तर दातांमध्ये साठलेलं अन्न कुजून दुर्गंध येऊ लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी बरेच उपाय केले जातात. ओव्याच्या पाण्याने तोंडाची दुर्गंधी दूर होऊ शकते. यासाठी थोड्या पाण्यात ओवा घालून उकळून घ्या. या पाण्याने चूळ भरल्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या कमी होऊ शकते. हिरड्यांमधून रक्त येत असेल तर ओव्याच्या तेलाचे काही थेंब गरम पाण्यात घालून या पाण्याने चूळ भरल्यामुळे हिरड्यांमधलं रक्त थांबू शकतं.

जपणूक त्वचेची


### त्वचेवर दिसतात परिणाम



शरीरात एखाद्या पोषक घटकाची कमतरता असल्यास त्याची लक्षणं दिसू लागतात. त्वचा पांढरी पडणं, त्वचेवर चट्टे पडणं, पिंपल्स येणं ही एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेची लक्षणं असू शकतात. त्वचा निस्तेज, पांढरट दिसणं हे बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेचं लक्षण असू शकतं. त्वचेवर पुरळ किंवा पिंपल्स येत असतील तर हे 'अ' आणि 'ई' या जीवनसत्त्वांच्या कमतरतेचं लक्षण ठरू शकतं. त्यामुळे त्वचेच्या समस्या असतील तर या जीवनसत्त्वांच्या कमतरतेची तपासणी नक्की करून घ्या.

आजीबाईचा बटवा

### नैराश्यावर प्रभावी उपाय



सध्या अनेकांना नैराश्याने ग्रासल्याचं पहायला मिळतं. नैराश्याच्या या समस्येवर बरेच उपचार करावे लागतात. पण काही घरगुती उपायांनी तुम्हाला बरं वाटू शकतं. हळद आणि लिंबाच्या मिश्रणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांमध्ये बरं वाटू शकतं. यासाठी एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात एका लिंबाचा रस घाला. यात दोन चमचे हळद आणि चार चमचे मध घाला. हे सर्व घटक नीट मिसळून घ्या. दिवसातून दोन वेळा हे पाणी प्या. यामुळे लाभ होतील. हळदीतल्या पोषक घटकांमुळे नैराश्याची तीव्रता कमी होऊ शकते.

# स्मार्ट मीटर रद्द करा, ग्राहकांची लूट थांबवा; भाकपचे महावितरण कार्यालयासमोर आंदोलन

नगर – राज्यासह जिल्ह्यात स्मार्ट इलेक्ट्रिक मीटर बसविण्याचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, वीज ग्राहकांची आर्थिक लूट थांबवावी आणि वीज उद्योगाचे खासगीकरण रद्द करावे, या प्रमुख मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) वतीने शहरातील महावितरण कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. स्मार्ट मीटर रद्द करा, वीज ग्राहकांची लूट बंद करा, महावितरण होश में आओ अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.


येथील महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करताना भाकप कार्यकर्ते.

आंदोलनात भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. भारती न्यालपेल्ली, कॉ. सतीश पवार, अविनाश साठे, संगीता कोफ्लडा, पंकज गुंदेचा, कॉ. डॉ. सुभाष कडलग, कॉ. गनी शेख, लक्ष्मीबाई कोटा, दीपक शिरसाठ, कॉ. शारदा बोगा, तुषार सोनवणे आणि रेखा बोगा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व वीज ग्राहक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान अनेक नागरिकांनी स्मार्ट मीटरबाबतच्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या म्हणण्यानुसार, संमती न घेता घरांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून त्यानंतर वीजबिलात मोठी वाढ झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही महावितरणकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला.

कॉ. सुभाष लांडे म्हणाले, वीज ही आज सर्वसामान्य नागरिकांची मूलभूत गरज बनली आहे. मध्यमवर्गीय, शेतकरी, शेतमजूर, कामगार व असंघटित क्षेत्रातील कष्टकरी वर्गासाठी वीज सेवा अत्यावश्यक असून ती खासगी कंपन्यांच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न हा लोकहिताच्या विरोधातील असल्याचा आरोप त्यांनी केला.

कॉ. सुधीर टोकेकर यांनी सांगितले, महावितरणकडून ग्राहकांची दिशाभूल करून किंवा वीजपुरवठा खंडित करण्याची भीती दाखवून स्मार्ट इलेक्ट्रिक मीटर बसविण्याची मोहीम राबविली जात आहे. वीज कायदा २००३ नुसार कोणत्या प्रकारचे मीटर वापरायचे, याचा अधिकार ग्राहकांनाही आहे. सरकारने यापूर्वी स्मार्ट मीटर सक्तीने बसविण्यात येणार नसल्याचे आश्वासन दिले होते. तसेच सर्वोच्च न्यायालयातही याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. मात्र प्रत्यक्षात मोबाईलवर नोटिसा पाठवून ग्राहकांवर स्मार्ट मीटर स्वीकारण्याचा दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

यावेळी महावितरणला निवेदन देऊन पंजाब आणि तामिळनाडूप्रमाणे महाराष्ट्रातही स्मार्ट मीटर न बसविण्याचा निर्णय घ्यावा, सन २०१४ पासूनची वीजदरवाढ मागे घ्यावी, वीज उद्योगाचे खासगीकरण थांबवावे, कृषी पंपांसाठी सौर–ऊर्जेची सक्ती रद्द करावी, घरगुती व शेतकरी ग्राहकांना सामान्य मीटरद्वारे तातडीने वीजजोडणी द्यावी, शेतकऱ्यांना २४ तास अखंडित वीजपुरवठा करावा तसेच नवीन वीजजोडणीसाठी स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करून प्रस्तावित वीज विधेयक २०२५ मागे घ्यावे, अशी मागणी करण्यात आली.

# नगर महाविद्यालयाच्या मैदानावर २७ जुलैपासून 'फुटबॉलचा थरार'

नगर – जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देणाऱ्या आणि शालेय फुटबॉलमधील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या फिरोदिया शिवाजियन्स अॅकॅडमी आयोजित ८ व्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला २७ जुलै पासून अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर प्रारंभ होत आहे. रोज सकाळी १०.३० वाजता फुटबॉल स्पर्धेचा थरार रंगणार आहे. ही स्पर्धा अहमदनगर महाविद्यालयाच्या सौजन्याने व अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे.

ही स्पर्धा शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनचे मुख्य विश्वस्त व फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया तसेच शिवाजियन्स स्पोर्ट्‌स क्लबचे अध्यक्ष व फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या विशेष पुढाकाराने पार पडत आहे. शालेय स्तरावरील फुटबॉलला चालना देणे, गुणवंत खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जिल्ह्यात फुटबॉल संस्कृती अधिक बळकट करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

स्पर्धेचे उद्घाटन सहभागी शाळांच्या कर्णधारांच्या हस्ते होणार असून, यावेळी अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य, फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर तसेच अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे इतर पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यंदाच्या स्पर्धेत ५३ संघ सहभागी होत असून १२ वर्षांखालील मुले, १४ वर्षांखालील मुले, १६ वर्षांखालील मुले आणि १६ वर्षांखालील मुली अशा चार गटांत १०० हून अधिक सामने खेळविण्यात येणार आहेत. लीग–कम–नॉकआऊट पद्धतीने आयोजित होणारी विभागातील ही एकमेव आंतरशालेय फुटबॉल स्पर्धा असून प्रत्येक संघाला साखळी फेरीत आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

उत्तम नियोजन, शिस्तबद्ध आयोजन, दर्जेदार पंच व्यवस्था, खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा आणि व्यावसायिक व्यवस्थापन यामुळे या स्पर्धेने राज्यातील शालेय फुटबॉलमध्ये वेगळे स्थान निर्माण केले असून, ही स्पर्धा जिल्ह्यातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या स्पर्धांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

स्पर्धेच्या नियोजन व आयोजनासाठी फुटबॉल असोसिएशनचे सचिव रौनप फर्नांडिस यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच फिरोदिया शिवाजियन्स अॅकॅडमीच्या मुख्य आयोजन समितीचे सदस्य पल्लवी सैंदाणे, राजेश अँथनी, अभिषेक सोनवणे, अभय साळवे, जेव्हिअर स्वामी आणि सचिन पात्रे, तसेच फिरोदिया शिवाजियन्स अॅकॅडमी व शिवाजियन्स स्पोर्ट्‌स क्लबचे सदस्य, प्रशिक्षक व खेळाडू स्पर्धेसाठी परिश्रम घेत आहे.


१९३७ पासून सुवर्ण परंपरा असलेले एस.जी. कायगावकर या दालनात १ हजार रुपयांमध्ये घरबसल्या २२ कॅरेट सोनं इ गोल्ड ॲपद्वारे खरेदी करा योजनेचा शुभारंभ आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर उद्योगपती नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कल्पना कायगावकर, कृष्णा देवळालीकर, सुभाष कायगावकर, शिवांग देवळालीकर, सागर कायगावकर, ओम कायगावकर, श्वेता देवळालीकर, आदिती कायगावकर, शिवराज कायगावकर, विजय देवळालीकर आदी उपस्थित होते.

# पंचमहाआक्रोश आंदोलनाने जिल्हाधिकारी कार्यालय दणाणले

नगर – विद्यार्थी, ऊसतोडणी मजूर, शेतकरी, कामगार, ग्रामीण नागरिक, स्थानिक स्वराज्य संस्था आणि झोपडपट्टीधारकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने २४ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पंचमहाआक्रोश आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी शासन आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तीव्र निषेध व्यक्त केला.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पंचमहाआक्रोश करताना पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद संघटनेचे कार्यकर्ते.

या आंदोलनात शेतकरी, शेतमजूर, ऊसतोडणी मजूर, कामगार, झोपडपट्टीधारक, सामाजिक कार्यकर्ते, महिला, युवक आणि विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, वीर बहादुर प्रजापती, बबलू खोसला, अशोक भोसले, पोपट भोसले, माऊली चांदणे, विलास साळवे, दिलीप साळवे, शंकर साळवे, गोरख बर्डे, उत्तम बर्डे, सतीश बर्डे, शरद बर्डे, विशाल बर्डे, धोंडीराम गायकवाड आणि शाहीर कान्हू सुंबे यांच्यासह अनेक कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या पुढाकाराने विविध प्रश्नांनी त्रस्त नागरिकांनी आपल्या घटनात्मक हक्कांसाठी संघटित लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. आंदोलनातून मांडण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये पर्यावरणवादी व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक तसेच आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य कराव्यात आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशीही भूमिका आंदोलकांनी मांडली.

महाराष्ट्रातील ऊसतोडणी मजुरांची मुकादम, ठेकेदार आणि साखर कारखानदारांकडून होत असल्याचा आरोप असलेली आर्थिक पिळवणूक व शोषण तातडीने थांबवावे, ऊसतोडणी मजुरांना योग्य मजुरी, आरोग्य सुविधा, सुरक्षित निवास, विमा आणि सामाजिक सुरक्षेचे कायदेशीर संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी आमच्या हक्कांचा विजय असो, ऊसतोडणी मजुरांचे शोषण बंद करा, पंचायत राज निवडणुका तातडीने घ्या, पाणीचोरी आणि वीजचोरी बंद करा, झोपडपट्टीधारकांना मालकीहक्क द्या अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना सादर करण्यात आले.

# धनादेश अनादर प्रकरणात आरोपीस तीन महिन्यांची शिक्षा

नगर – येथील अतिरिक्त मुख्य न्यायाधिशांनी दोन धनादेश अनादर प्रकरणांमध्ये सागर शंकर पाटील (रा. मालेगाव) याला दोषी ठरवत तीन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

न्यायालयाने एका प्रकरणात २ लाख ३० हजार, तर दुसऱ्या प्रकरणात २ लाख ४० हजार असा एकूण ४ लाख ७० हजार रुपयांचा दंड भरण्याचे आदेश दिले आहेत. दंडाची रक्कम न भरल्यास प्रत्येक प्रकरणात स्वतंत्रपणे एक महिन्यांचा अतिरिक्त साधा कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये फिर्यादीतर्फे ॲड. फारूक हबीब शेख (तांबोळी) आणि ॲड. मुजाहीद एम. पठाण यांनी युक्तिवाद करत फिर्यादीची बाजू मांडली. त्यांचा युक्तिवाद आणि सादर करण्यात आलेले पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीविरुद्ध दोष निश्चित करत शिक्षा सुनावली.



पैठणी व साडी महोत्सवाचे उद्घाटनप्रसंगी धनश्रीताई विखे पाटील. समवेत महोत्सवाचे आयोजक. शेजारील छायाचित्रात पैठणीसह साड्या खरेदीसाठी महिलांची झालेली गर्दी.

# नगरमध्ये सोनाली पैठणीसह साडी महोत्सवाचे उद्घाटन

**२ ऑगस्टपर्यंत खरेदी करण्याची संधी**

नगर – सावेडीतील येथील बंधन लॉन्स (डी–मार्टजवळ) येथे आयोजित करण्यात आलेल्या सोनाली पैठणी आणि साडी महोत्सवाचे उद्घाटन २३ जुलै रोजी धनश्रीताई विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेविका शीतल संग्राम जगताप यांची विशेष उपस्थिती होती.

या महोत्सवात देशभरातील प्रसिद्ध आणि अस्सल साड्यांचा वैविध्यपूर्ण संग्रह महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. थेट विणकरांकडून आणलेल्या साड्यांमध्ये येवला पैठणी, बनारसी सिल्क, कांजीवरम सिल्क, ताना सिल्क, पटोला सिल्क, चंदेरी सिल्क, माहेश्वरी सिल्क तसेच कॉटन सिल्क अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. पारंपरिकतेसोबत आधुनिक डिझाइनचा संगम असलेल्या या साड्यांना ग्राहकांकडून विशेष पसंती मिळत आहे.

महोत्सवात ५०० पासून ते २ लाखांपर्यंतच्या विविध किमतींमध्ये साड्या उपलब्ध आहेत. मॉन्सून ऑफरअंतर्गत निवडक साड्यांवर ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत असून, दररोज पहिल्या १०० महिलांना ५ हजारांच्या खरेदीवर चांदीची आकर्षक भेटवस्तू देण्याची विशेष योजना राबविण्यात आली आहे.

हा महोत्सव २३ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत दररोज सकाळी १० ते रात्री १० या वेळेत बंधन लॉन्स येथे सुरू राहणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग तपासणी शिबीर

नगर – बालकांच्या आरोग्य संवर्धनासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत बालरोग तपासणी शिबिराला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ७२ बालकांची मोफत तपासणी करण्यात आली. शहरासह ग्रामीण भागातील पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तज्ज्ञ डॉक्टरांकडून आपल्या पाल्यांची आरोग्य तपासणी करून घेतली.


आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. निखिलकुमार गुट्टे व मान्यवर

शिबिरामध्ये बालकांच्या विविध आरोग्यविषयक समस्यांचे निदान, आवश्यक उपचार, आहार, लसीकरण, वाढ व विकास याबाबत पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. समाजोपयोगी या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दर्जेदार वैद्यकीय सेवा विनामूल्य मिळाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

शिबिराचे उद्घाटन डॉ. निखिलकुमार गुट्टे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया, प्रकाश छल्लाणी, डॉ. वसंत कटारिया, अभय गुगळे, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा आणि डॉ. आशिष भंडारी उपस्थित होते.

शिबिरात डॉ. निखिलकुमार गुट्टे (नवजात शिशु व बालरोग तज्ज्ञ), डॉ. सचिन तोडमल (बालरोग तज्ज्ञ), डॉ. रुपेश सिकची (पीडियाट्रिक सर्जन), डॉ. वैभवी वंजारे (बालरोग तज्ज्ञ) आणि डॉ. दीपी अग्रवाल (बालरोग तज्ज्ञ) यांनी बालकांची तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक डॉ. आशिष भंडारी यांनी केले.

डॉ. निखिलकुमार गुट्टे यांनी रुग्णालयातील अत्याधुनिक सुविधांची माहिती दिली. यामध्ये २६ बेडचे सुसज्ज एनआयसीयू, नवजात बालकांच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावरील उपचार, बालदमा, ए.आर.डी.एस., नवजात कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक तसेच जन्मजात आजारांचे निदान, बालकांचे टू–डी इको, एक्स–रे, अत्याधुनिक पॅथॉलॉजी लॅब, २४ तास उपलब्ध तज्ज्ञ डॉक्टर तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध असल्याचे सांगितले.

आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले. शिबिरासाठी रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरीचे लोकार्पण करताना आ.संग्राम जगताप व मान्यवर. (छाया – लहू दळवी)

# अत्याधुनिक एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरीचे श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्रात लोकार्पण

नगर – गेल्या ३६ वर्षांपासून सर्वसामान्य व गरजू रुग्णांना अल्प दरात आरोग्यसेवा उपलब्ध करून देणाऱ्या श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्र, स्वर्गीय बसंताबाई शिवलालजी गांधी चिकित्सालय येथे अत्याधुनिक एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरीचे लोकार्पण उत्साहात करण्यात आले.


स्वर्गीय शिवलालजी गांधी यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या सेवाभावी कार्याचा वारसा गांधी परिवार अत्यंत समर्पितपणे पुढे नेत असून, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रुग्णांना अधिक अचूक व दर्जेदार तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम समाजासाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. यावेळी अण्णासाहेब मुनोत, उद्योजक संतोष बोथरा, सतीश लोढा, सीए अजय गांधी, ॲड. अशोक गांधी, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, नगरसेविका मीनाताई चोपडा, माजी महापौर भगवान फुलसौंदर, सीए रवींद्र कटारिया, नरेंद्र बाफना, सागर गांधी, शरद मुनोत, पुष्पाताई गांधी, राखी गांधी, चैताली गांधी आणि संजय गुगळे आदी उपस्थित होते.

सागर गांधी यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्राच्या माध्यमातून गेल्या ३६ वर्षांपासून गरजू रुग्णांना अल्प दरात आरोग्यसेवा दिली जात आहे. रुग्णांच्या आजारांचे तातडीने व अचूक निदान व्हावे यासाठी एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅबच्या माध्यमातून तपासण्या करण्यात येतात. यामुळे डॉक्टरांना योग्य वेळी उपचार सुरू करणे शक्य होते.

या केंद्रातील आरोग्यसेवेचा दररोज सुमारे ५०० रुग्ण लाभ घेतात. केंद्रातील पूर्वीची एक्स–रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरी जुनी झाल्याने गांधी परिवाराच्या वतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन मशिनरी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे तपासण्यांमध्ये अधिक अचूकता, वेग आणि विश्वासार्हता वाढून रुग्णांना अधिक दर्जेदार सेवा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# चातुर्मास...आत्मौध्दाराचे दिवस खास

आज शनिवार जुलै २५. पावनपवित्र आषाढी एकादशी. जसं नभ मेघांनी आक्रमिले जाते तद्वतच आज लाखो वारकरी पंढरपूरच्या विठ्ठल–चरणी समर्पिले जातात. जागतिक आश्चर्य असलेल्या या जगन्नाथ पुरीच्या महायात्रेस वारीला अवघा महाराष्ट्र श्रद्धेने नतमस्तक होतो.



यानिमित्त एक विचार चमकून गेला. गणेशोत्सवाप्रमाणे यात प्रत्येक जाती धर्माचा विशेषतः नवयुवावर्ग अधिक गुंतवला गेला तर ? युवा मित्रांना धार्मिक, अध्यात्मिक चिंतन, मननासह समाजाच्या अधिक जवळ येता येईल.

आता आषाढीतील या भव्य मांदियाळीनंतर २९ जुलैच्या गुरुपौर्णिमेपासून चातुर्मासाला प्रारंभ होईल. चातुर्मास हिंदू संस्कृतीतील, जैन परंपरेतील महत्त्वाचे ४ महिने. पंचांगाप्रमाणे ४ पवित्र महिन्यांचा काळ. देवशयनी एकादशीपासून कार्तिक महिन्याच्या प्रबोधिनी एकादशीपर्यंतचा काळ. या काळात भगवान महाविष्णु योगानिद्रेत लीन होतात अन् देवाधीदेव महादेव सृष्टीच्या संचालन, रक्षणाची काळजी घेतात. या विशेष दिवसांत तप, उपवास, साधना, आराधना, दानपुण्य, भक्तीसाठी सर्व श्रद्धाळू कार्यरत राहून आत्मोन्नती व आत्मोध्दारासाठी तन, मन, धनाने प्रयत्न करतात. वैज्ञानिकदृष्ट्या या पावसाळी मोसमात आहार विषयक जागृती राहून माणूस उपवास करून शरीराची हानी टाळतात.

आज यावर्षीची जैनियांच्या समर्पण चातुर्मासाविषयी बोलूया. तस तर आपले अहिल्यानगर शहर म्हणजेच जैनियांच्या सर्वांगीण सहभाग व कर्तृत्वाच्या दृष्टीने जणू काशी आहे. महाराष्ट्राच्या या 'मारवाड' मध्ये राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पदस्पर्शाने, सान्निध्याने सकल जैन संघाचा बोलबाला आहे.

या विशेष चातुर्मासानिमित्त शहरात सिंहाचा मग ते लोकसंख्येच्या दृष्टीने व सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने असणाऱ्या जैनांबद्दल काही विचार मनात आले ते समाजहिताच्या दृष्टीने चिंतन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न व्हावा असे वाटते. जैन समाज अवघ्या भारतवर्षात आता तर केवळ एक कोटीच्या आसपास असेल एकूण संख्या. परंतू त्यातही स्थानकवासी, मंदिरमार्गी, दिगंबर, श्वेतांबर आणिक कशाकशात विखुरलेले. नगरमध्ये तर त्यातही अधिक पोटप्रकार आणि यामध्ये विविध गट–तट.

वास्तविक जैनियांचे शहराच्या, देशाच्या व समाजाच्या सर्वांगिण विकासात सिंहाचा वाटा होता, आहे व राहील. मग ते जीएसटी, आयकर, विविध आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, व्यावसायिक त्यात किंवा कोणतेही क्षेत्र असो...

तरीपण वाटते की सध्याच्या सामाजिक, राजकीय वातावरणात आपले अस्तित्व दिसले पाहिजे. त्यासाठी एकी जरुरीची आहे. तसेच आपल्या नव्या पिढीपुढे हा एकीचा, धर्म प्रभावनेचा आदर्श ठेवावा लागेल. ही जबाबदारी केवळ साधू संतांची नाही तर समाजातील नेतृत्व करणाऱ्यांची – करू ईच्छिणाऱ्यांची आहे.

आचार्यश्रींच्या शिष्यांनी आपापला ठसा उमटवला आहे. सर्वसामान्यांसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल, रक्तपेढी, नर्सिंग, नेत्रालय, अत्यल्प दरात भोजनालय, नव्या पिढीसाठी अद्ययावत महाविद्यालय इ. आदर्श उभारले आहे तर अत्यंत प्रविणतेने अर्हम बिज्ञा, गौतम निधी कलश, चिंचोडीत भव्य जैन प्रकल्प इ. द्वारे समाजाला पुन्हा एकत्र आणण्यास प्रखर धर्म प्रभावनेस वाहून घेतले आहे.

सर्वांनी एकत्र येऊन समाजाला अधिक पुढे नेण्याचा प्रयत्न केल्यास नगरचे नाव जैनियांच्या इतिहासात अजारामर होऊन गुरुदेवांचे जगभर नाव चिरंतन राहिल अर्थात हे समाजहिताच्या भावनेने प्रकट विचार आहेत.

आता यावर्षीच्या चातुर्मासाविषयी. तो नक्कीच भव्य दिव्य आणि अधिक समर्पणाचा होईल असे दिसते. महिनाभरापासून शहराच्या कानाकोपऱ्यापर्यंत जैन चातुर्मासामुळे धार्मिक वातावरण नवचैतन्याने बहरले आहे. तप, साधना, दान, जप, आराधनाने मांगल्यमय भक्तीभाव वाढत आहे. यातील समर्पण भाव निरंतर टिकून राहावा ही गुरुदेव चरणी प्रार्थना.

धार्मिक व सामाजिकदृष्ट्या हा चातुर्मास मैलाचा दगड ठरावा. वास्तविक केवळ जैनियांच नाही तर सर्वच सनातनी, हिंदू बंधूभगिनींना आत्म्यापासून परमात्मापर्यंत जाण्यासाठी हा चातुर्मास असतो. वासनेपासून उपासनेपर्यंत, भोग पासून योग पर्यंत, प्रदर्शनापासून स्वयं दर्शनासाठी हा व प्रत्येक चातुर्मास महत्त्वपूर्ण व्हावा. यामध्ये मुले, महिला, युवकांसाठी विशेष शिबीरांचेही आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्त आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

– **किशोर गांधी** (दिशान फिचर्स)

